
# पहिले राष्ट्रपती

लय,
विषय ता. व
दा. क्र. २०७९



BVBK-0402941

सरस्वती ग्रंथ भांडार, पुणे २.

# डॉ. राजेंद्रप्रसाद



## श्री. अरविंद पाटोळे

BVBK-0402941

मे. सरस्वती ग्रंथ भांडार

# अनुक्रमणिका


१. भारत - रत्नांची खाण..............३
२. असा समाज - असे बदल..........३
३. असा वारस, असे संस्कार ........५
४. गावचे वातावरण ................७
५. राजेंद्रप्रसादांचे शिक्षण..............७
६. प्रेसिडेन्सी कॉलेजात...............१०
७. नापास होईनच कसा!............११
८. कलकत्त्यात शिक्षणाबरोबरच.......१२
९. विलायतेला जाण्याचा विचार.......१४
१०. ना. गोखले यांची भेट............१५
११. म. गांधींचे दर्शन!................१७
१२. चंपारण्यातील शेतकऱ्यांसाठी
चळवळ............................१७
१३. 'खेडा' चा सत्याग्रह................१९
१४. यापुढे वकिली नाही!..............२१
१५. सदाकत आश्रमाची सुरुवात........२२
१६. आधी केले मग सांगितले..........२३
१७. अशी जनसेवा.....................२५
१८. निग्रही सत्याग्रही..................२७
१९. त्यांची ही काळजी ...............२७
२०. मी त्यांच्यातलाच एक.............२८
२१. तुरुंगातही कार्य....................३०
२२. राजेंद्रप्रसादांचे थोरपण.............३१



*प्रकाशक ❐ मुद्रक :*

**प्रकाश य. कुंदूर**

**मे. श्रीराम ऑफसेट**

**क्वालिटी प्रिंटर्स आणि पब्लिशर्स**

सर्व्हे नं. १४/२३ 'गायत्री',
मु. पो. धायरी, पुणे ४१.

*प्रमुख विक्रेते :*

**मे. सरस्वती ग्रंथ भांडार**

अप्पा बळवंत चौक,
पुणे २.

**मे. सरस्वती बुक डेपो**

नवी पेठ, सोलापूर ७.



*लेखक :*

**श्री. अरविंद पाटोळे**

स. नं. २३/८ हिल पॉइंट,
सह. गृहरचना संस्था,
प्लॉट नं. ११, श्रीधरनगर,
धनकवडी, पुणे ४३.



आवृत्ती : १९९४



© सर्व हक्क प्रकाशकांकडे



किंमत १० रुपये

## १. भारत - रत्नांची खाण

भारत एक रत्नांची खाण आहे. खाणीत दगड असतात, माती असते. त्यातच कुठंतरी रत्नं असतात. दगडाआड दडलेली, मातीमध्ये मळलेली; ती शोधली, काढली, स्वच्छ केली की तेजाळतात, खूप प्रकाशतात. बघणाराचे डोळे दिपवतात. फार जुन्या काळात अशी रत्नं भारतात होती. भारत श्रीमंत होता. ही श्रीमंती पुढं पुढं कमी झाली. लोपून गेली.

तरीही भारत रत्नांची खाण आहेच. फक्त रत्नं बदलली. निर्जीव रत्नांऐवजी या खाणीत सजीव रत्नं जन्मली. नररत्न! निर्जीव रत्नांपेक्षा सजीव रत्नांनी भारताची प्रतिष्ठा वाढवली. जगात किंमत वाढवली, सन्मान मिळवला.

वशिष्ठ, विश्वामित्र ऋषी तपस्वी झाले. द्रोण, कृपासारखे ऋषी-आचार्य झाले, गुरू झाले. वाल्मीकी, व्यास, कालिदाससारखे कवी झाले. राम, कृष्ण, हरिश्चंद्र, बौद्ध, अशोकासारखे आदर्श राजे झाले. सीता, तारामती, अहिल्येसारख्या वंदनीय स्त्री–रत्नांना जन्म मिळाला. हनुमंत, एकलव्य, अरुणीसारखे शिष्य निर्माण झाले. तुलसीदास, सुरदास, कबीर, तुकाराम, ज्ञानेश्वर इ. संतांनी या भूमीत जन्म घेतला. अगदी लो. टिळक, म. गांधी, डॉ. आंबेडकरांसारख्या व्यक्ती इथंच जन्मल्या.

ही व अशी सारीच व्यक्तित्व थोर. हिमालयासारखी उत्तुंग, कुणी तपस्येत, कुणी शिक्षणात, विद्यार्जनात, कुणी अध्यापनात, कुणी लेखनात, कुणी प्रशासनात, कुणी राजकारणात, कुणी नीतीत, कुणी संतत्वात सारेच थोर, आपापल्या क्षेत्रात श्रेष्ठ. सारेच आदर्श.

म्हणूनच भारतीय संस्कृती टिकली. हजारो वर्षे उभी राहिली. इंग्रज, मोगल, फ्रेंच, डच, पोर्तुगीज, हुण, कुशाण, इराणी, अरबी साऱ्या–साऱ्यांना पुरून उरली. ते आले, संपलेसुद्धा; पण भारतीय संस्कृती आहे, ते संस्कार आहेत.


हे सारं घडवलं या नररत्नांनी, हे सारं टिकवलं या नररत्नांनी. हे वाढवलं याच नररत्नांनी. याची ठेव पुढच्या पिढीसाठी दिली यांनीच. याच मालिकेत एकोणिसाव्या शतकात निर्माण झालेल्या अनेक रत्नांपैकी एक रत्न म्हणजे डॉ. राजेंद्रप्रसाद. स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती. अहिंसेचे उपासक, सच्चे समाजसेवक, पक्के देशभक्त, मुरब्बी राजकारणी, विद्वत्तेत प्रकाण्ड पंडित, पट्टीचे वक्ते.

☆ ☆ ☆

## २. असा समाज – असे बदल

डॉ. राजेंद्रप्रसाद. भारताचे पहिले राष्ट्रपती. बिहारचे सुपुत्र. झिरादेई हे त्यांचं गाव. शके १८०६ मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमा ३ डिसेंबर १८८४ हा त्यांचा जन्म दिवस. त्यांच्या वडिलांचे नाव महादेवभाई सहाई. त्यांचं आडनाव श्रीवास्तव. त्यांचं कुटुंब शेतकऱ्याचं.

शेतकऱ्यांचं कुळ म्हणजे क्षत्रकुल, पराक्रमी, शूरांचं कुल. या कुलातील व्यक्तीनं शूर व्हावं, पराक्रमी व्हावं. शिक्षण हे ब्राह्मण कुळासाठी. राजेंद्रप्रसादांनी हे चाक उलटं फिरवलं. ब्राह्मणाला शोभेल असा शांत स्वभाव. तशीच विद्येची उपासना. भारताला स्वतंत्र केलं काँग्रेसनं. त्या



**शेतकरी कुटुंबात एक तेजस्वी बालक जन्माला आले.**

काँग्रेसचा व राजेंद्रप्रसादांचा जन्म एकाच वेळचा. काय छान योगायोग आहे पहा!

त्यांच्या जन्माच्या वेळी बिहारची वाताहत झालेली. बंगाल, आसाम, ओरिसाची स्थिती तशीच झालेली. भारतात ग्रामपंचायतींनी राज्यकारभार स्थिर केला होता. तीच संस्था मोडकळीस निघाली. शेतीतील अन्नधान्य कमी झाले. औद्योगिक पिके वाढली. युरोपियन व्यापाऱ्यांची चंगळ झाली. त्यांचे खिसे भरू लागले. याच पिकांची शेतकऱ्यांवर सक्ती झाली.

शेतकरी राजा आता राजा नव्हता. गुलाम होता. त्याला स्वतःचे मत नव्हते. सत्तेचा तो गुलाम होता. त्याचं स्वतःचं उत्पन्न कमी झालं होतं. दोन वेळची काळजी पडत होती. उपाशी, अर्धपोटी दिवस ढकलत होते. कर्ज काढत होते. सावकारीपाशात अडकत होते. सावकारांचे उखळ पांढरे झाले. शेतकऱ्यांचे फक्त सापळे राहिले. शरीराने पिचले, मनाने खचले, दुर्बल झाले. भूमिहीन झाले. वेठबिगार झाले.

इंग्रज शासक झाले. त्यांना नोकर हवे होते. इथलेच नोकर हवे होते. तेच परवडणारे होते. त्या दिशेने काम केले. इंग्रजीचा प्रचार केला, प्रसार केला. इंग्रजी साहित्याची ओळख करून दिली. बुद्धिमानांचे विचारक्षेत्र वाढले. त्यांच्यात

जागृती झाली. सर्वत्र नव्या जाणिवा निर्माण झाल्या. बुद्धिमान लोक सुधारणांच्या मार्गाला लागले.

बिहारची संस्कृती उच्च होती. ते संस्कार टिकून होते. भगवान बुद्धांचा जन्म बिहार प्रांतातला. महावीर जैन इथलेच. दोघांचे अवतार-कार्य याच प्रांतातले. अशोकाची राजधानी पाटलीपुत्र. आताचे पाटणा शहर. संस्कृती व समृद्धीचे निवासस्थान. ते याच प्रांतात. नालंदा विद्यापीठ, जगप्रसिद्ध. विद्वानांचे माहेर. कला व तत्त्वज्ञानाचे आगर ते बिहारमध्येच.

अकराव्या शतकात इस्लाम आले. वैभव गेले. संस्कृतीला उतरती कळा लागली. बिहार इस्लामी संस्कृतीचे केंद्र बनले. १८ व्या शतकात युरोपियन आले. व्यापारासाठी आले. अफू-नीलवर वर्चस्व मिळविले. सोडाखार, मलमलीचे उत्पन्न हस्तगत केले. बिहारींचे धंदे बुडाले. उद्योग संपले. अर्थव्यवस्था कोलमडली. बिहार प्रांत बंगालला जोडला. बंगालचे वर्चस्व वाढले. स्वतंत्र अस्तित्व संपले.

बिहारमधील समाजाची अशी स्थित्यंतरे घडत होती. संस्कार बदलत होते, वातावरण बदलत होते, संस्कृती बदलत होती. पीकपाणी बदलत होते. परिणामी, लोकजीवन बदलत होते. अशा पार्श्वभूमीवर राजेंद्रप्रसादांचा जन्म झाला. तोसुद्धा एका शेतकरी कुटुंबात. कष्टकरी, श्रमजीवी कुळात. त्यांची जडणघडण अशा वातावरणात झाली. अशा परिस्थितीत व्यक्तित्व उमलू लागले, बहरू लागले.

☆ ☆ ☆

## ३. असा वारसा, असे संस्कार

राजेंद्रप्रसाद बिहारचे. पण खरंतर त्यांचे वंशज बिहारचे नव्हेत. ते उत्तर प्रदेशातले. तिथून ते बिहारात उतरले. सारण जिल्ह्यात आले. झिरादेई गावात स्थायिक झाले. येताना त्यांनी धनसंपत्ती काही काहीच आणलं नाही. आणण्यासारखं नव्हतंच तर आणणार काय! एक गोष्ट मात्र ते घेऊन आले. ती म्हणजे कुशाग्र बुद्धी. खरंतर तेच सर्वांत मोठं धन. ते कोणी चोरू शकत नाही. ठेवून घेऊ शकत नाही. दुसऱ्यास दिल्याने मात्र वाढतच जाते.

याच बुद्धीनं साथ दिली. शेतकी हस्तगत केली. शिक्षण प्राप्त केलं. राजेंद्रप्रसादांचे चुलत आजोबा चौधरीलाल, त्यांच्यात स्वामिनिष्ठा होती. व्यवहारकुशलता होती. विद्येची आवड होती. बिहारात त्यांनी जम बसविला. मोठ्या जमीनदाराचे मुख्य कारभारी झाले.

जमीनदाराचे काही दावेदार होते. ते घात करतील अशी शंका आली. चौधरीलाल त्यांच्या शेजारी झोपत. अन्नातून कोणी विष घालू नये म्हणून आधी आपण खाऊन बघत. आजोबांची अशी स्वामिनिष्ठा नातवामध्ये प्रगटली नाही तरच नवल.

राजेंद्रप्रसादांचे वडील मुनशी महादेव सहाई. गावात सभ्य प्रतिष्ठित मानले जात. संस्कृत

फारशी भाषेचे विद्वान होते. आयुर्वेदिक व युनानी औषधांची माहिती होती. ते लोकांना औषध देत. रोग्याला न पाहता, न तपासता औषध देत. केवळ ऐकिव माहिती करून देत. पण रोग्याला गुण येई. इतके ते विद्वान होते.

आई जुन्या वळणांची, परंपरा मानणारी, पाळणारी होती. सात्त्विक व धार्मिक होती. रामभक्ती करीत. रामाची पूजा व रामायणाचे वाचन यांत वेळ घालवीत. आपल्या मुलाला रामायणातील गोष्टी सांगत. चांगले संस्कार घडवीत. इ. स. १९१० साली त्या वारल्या.

थोरली बहीण भगवती. अत्यंत व्यवहारी. आईनंतर तिनेच राजेंद्रकडे लक्ष दिले. राजेंद्रची देशसेवा तिला आवडत नसे. तिला वाटे, कसली ध्येयनिष्ठा आणि कसला त्याग? याबद्दल ती भावाला खूप रागवे. आपला संसार करावा, घराचे नाव वाढवावे, नातेवाइकांच्या भेटीगाठी घ्याव्या, आदर्श गृहस्थाश्रमी बनावे असे तिचे मत,पण तरीही भावावर खूप प्रेम.राजेंद्रही तिला मान देत.

थोरले भाऊ महेंद्रप्रसाद. वडिलांमागे त्यांची जागा त्यानेच घेतली. राजेंद्रला ते मुलगाच मानत. त्यांनीच राजेंद्रचे पालनपोषण केले. कोडकौतुक केले. लाड केले. खूप शिकविले. सुप्त गुणांना वाव दिला. राजेंद्रप्रसादही आपल्या मुलापेक्षा– जनार्दनापेक्षा त्यांच्या दोन मुलांवर – मृत्युंजय, धनंजयवर खूप प्रेम करीत. तेच दोघे शेती, जमीनजुमल्याची व्यवस्था पहात. राजेंद्राच्या संसाराची सर्व जबाबदारी महेंद्र यांनीच उचलली. त्यांच्या देशभक्तीला वाव दिला. राजेंद्रही त्यांना मान देत. त्यांचा सल्ला मानीत.

राजेंद्रप्रसादांच्या पत्नी राजबंसी देवी. राजेंद्रप्रसाद यांच्या तेराव्या वर्षीच त्यांचे लग्न झाले. त्या एका जमीनदाराच्या मुख्य कारभाऱ्याच्या कन्या. त्या दिसण्यात साध्या, बोलण्यात रुबाबदार होत्या. त्यांनी राजकारणात रस घेतला नाही. पण गृहिणीची सारी कर्तव्ये पार पाडली. पतीच्या मार्गात आड कधीच आल्या नाहीत. त्या साबरमती आश्रमात राहिल्या. तिथे समरस झाल्या. असहकार चळवळीत भाग घेतला. कारावास भोगला. राजेंद्रांचे जीवन सुखी, संपन्न, समृद्ध केले. पतीची वर्षानुवर्षे गाठ पडत नसे. पण त्यांनी कुरकुरसुद्धा केली नाही. राजेंद्रप्रसादांनीच आत्मकथेत लिहिले आहे– "आमच्या पंचेचाळीस वर्षांच्या वैवाहिक जीवनात आम्ही पंचेचाळीस महिने तरी एकत्र राहिलो असू का नसू कोणास ठाऊक! इतक्या उद्योगात पती-पत्नीने एकत्र राहण्यास, जोडीने जीवन जगण्यास सवडच नसे."

राजबंसीदेवी लाजाळू व मर्यादशील होत्या. फारशा घराबाहेर पडत नसत. गाजावाजा, थाटमाट आवडत नसे. उत्सव, समारंभात भाग घेणे टाळत असत. स्वभावाने नम्र व शालीन. प्रौढत्वात सांधेदुखीचा त्रास सुरू झाला.

अशा तऱ्हेने राजेंद्रांचे एकंदर सारे कुटुंबच जुन्या वळणाचे. धार्मिक संस्कृतीत वाढलेले. ईश्वरनिष्ठा, धर्मावर श्रद्धा, हिंदी संस्कृतीचा अभिमान. कुलधर्म-कुलाचाराची आवड व त्यावर प्रेम. राजेंद्रप्रसादांना आपल्या कुटुंबाकडून याच गुणांची देणगी मिळाली.

☆ ☆ ☆

## ४. गावचे वातावरण

झिरादेई राजेंद्रांची जन्मभूमी. गाव तसं छोटसंच अगदी खेडं. बलुतेदारी होतीच. गावची देखरेख व न्याय-निवाडा ग्रामपंचायत करी. गावात हिंदु-मुसलमान दोघेही रहात. दोघांची संख्या समान होती. आपसात प्रेम होतं, आपुलकी होती, सहकार्य होतं, वातावरण खेळीमेळीचे असे. एकमेकांचा, एकमेकांच्या धर्माचा द्वेष नाही की मत्सर नाही. एकमेकांच्या धार्मिक कार्यात, मंगलकार्यात भाग घेत. मदत करीत. अशी साऱ्यांची एकी. मग भांडणं कसली? शत्रूत्व कोठले?

दिवाळी व होळी हे हिंदूंचे मुख्य सण. गाणे-बजावणे, नाच-रंग, नाटके, ललिते, रामलीला यांचा जल्लोष असायचा. रामलीला आश्विनात पण तयारी श्रावणापासूनच. रामलीलेचे आकर्षण सर्वात जास्त. तुलसी रामायणातील गीतं एकाने म्हणावयाची. पात्रांनी त्या ओळी म्हणत अभिनय करायचा. रामाचा विवाह, राज्यारोहण, सीता-हरण, रावणाशी युद्ध, लंकादहन, हनुमान-भक्ती सर्व प्रसंग दाखविले जात. रामाच्या लग्न-सोहळ्याच्या वेळी हत्ती, घोडे मंचावर आणत तर लंकादहन खरे वाटावे म्हणून लहान लहान झोपड्या करून आग लावीत. राम-राज्याभिषेकाच्या वेळी तर लोक नटाच्या चरणाचे दर्शन घेत. तेथे पैसे ठेवत किंवा इतर देणग्या देत.

स्त्रियांना मात्र पडदापद्धती होती. प्रतिष्ठित, घरंदाज घरातील स्त्रिया नाट्यगृहात येत नसत. त्यांच्यासाठी रंगवलेली पात्र राम, लक्ष्मण, सीता घरोघर जात व त्यांच्या पूजेचा स्वीकार करत. दक्षिणा घेत.

दसरा, दिवाळी, होळीत गाण्याचा नुसता उत्साह ओसंडून वाहत असे. रात्रीच्या रात्री त्यात निघून जात. नाचताना प्रमुख वाद्य ढोल. ढोल वाजविणारावर मुख्य मदार, तोही ही गोष्ट प्रतिष्ठेची मानायचा. आपला जीव ओतायचा. वाजवता वाजवता हाताच्या बोटाला फोड येत. फुटून जात. पुन्हा फोड येत. पुन्हा फुटत. हात रक्तबंबाळ होई. जायबंदी होई. पण छे! हटतो कोण? गावची प्रतिष्ठा जाईल ना? मग तोच जोर, तोच उत्साह शेवटपर्यंत तसाच रहायचा. ढोल घुमतच रहायचा.

☆ ☆ ☆

## ५. राजेंद्रप्रसादांचे शिक्षण

त्या दिवशी राजेंद्रची आई लवकर उठली. स्वतःचं स्नान, पूजाअर्चा आटोपली. राजेंद्रलाही लौकर उठवलं, अंघोळ घातली. नवे कपडे घालायला दिले. डोक्यावर टोपी घातली. छोटा राजेंद्र गोंधळला. आज एवढं काय विशेष आहे? काय सणबिण आहे का? त्यानं आईला विचारलंही, 'आई, आज काय आहे? कुठला सण आहे आज?'



मौलवींनी धूळपाटीवर राजेंद्रप्रसादांना पहिला धडा दिला.

ती कौतुकानं हसली. राजेंद्राला मायेनं कवटाळलं. पोटाशी लावत कुरवाळत म्हणाली, "वेडा कुठला? कसला आलाय सण आज?"

"मग आज लवकर उठवलं, हे नवे कपडे..?"

"अरे, आजपासून तुला शिकवायला मौलवीसाहेब येणार आहेत ना? चल देवघरात. रामाच्या पाया पड." असं म्हणत हात धरून त्याला देवघरात नेलं. रामाच्या पायावर डोकं ठेवायला सांगितलं आणि मग म्हणायला सांगितलं, "देवा, मला खूप खूप विद्या येऊ दे." मग राजेंद्रनं तसं म्हटलं. आई– वडील शिकलेले होते, म्हणून ही आवड.

राजेंद्रच्या डोळ्यापुढं आता मौलवीसाहेब दिसू लागले. भव्य मजबूत शरीर, धष्टपुष्ट बांधा, भरदार अगदी छातीपर्यंत लांब दाढी.

झिरादेई छोटं गाव. एकही, लहानसुद्धा शाळा नव्हती. मग राजेंद्र व त्याच्या चुलत भावांना शिकविण्यासाठी या मौलवीची नेमणूक झाली होती. ते उर्दू व फारशी शिकवीत असत. लोक शिकतील, शहाणे होतील, स्वातंत्र्य मागतील म्हणून इंग्रज खेड्यात शाळा काढत नसत. मग अशी घरगुती व्यवस्था करावी लागे. मौलवीसाहेबांना राजेंद्रांच्या घरीच जेवण देणार होते. शिवाय दरमहा चार रुपये पगार ठरला होता.

त्याकाळी पाटी–पेन्सिलही नव्हती. धूळ–पाटीवर अक्षरं गिरवावी लागत. धूळपाटी म्हणजे लाकडी फळीवर पसरलेली धूळ. मौलवीसाहेब आले. वडिलांनी लाकडी फळी आणली. त्यावर कोळशाची पूड पसरली. मौलवीसाहेबांनी त्यावर बोटानेच अक्षरे काढली. पहिला धडा दिला–

'बिसमिल्ला अईमान नी सहीम.'

कायस्थ कुटुंबात जन्मलेले, हिंदू संस्कृतीत वाढलेले, रामभक्तीची प्रीती असलेल्या या

राजेंद्रच्या शिक्षणाची सुरुवातच अशी धर्म-समन्वयानं झाली.

मौलवीसाहेब फक्त उर्दू व फारशीच शिकवीत. मग गणित व हिंदी शिकायला ही मुलं गावातील कोष्ट्याकडे जात. कोष्टी गुरुजी मागावर आपले विणकाम करीत व कापड विणता विणताच राजेंद्रास गणित शिकवी. हिंदी अक्षरे पण शिकवी. अशा तऱ्हेने गावातच घरच्या घरी प्राथमिक शिक्षण संपले. मौलवी राजेंद्रच्या वडिलांना म्हणाले, "मुलगा हुशार आहे. हायस्कूलमध्ये घाला." त्याकाळी खेड्यात शाळा नव्हत्या. पण जिल्ह्याच्या ठिकाणी इंग्रजी शिक्षणाची सोय होती. ही सोयसुद्धा खूप अपुरी होती. पंधरा लाख वस्तीच्या त्यांच्या सारण जिल्ह्यात अवघी तीन हायस्कूले त्या काळात होती.

मग राजेंद्रच्या वडिलांनी इंग्रजी शिकण्यासाठी झिरादेईपासून तेवीस मैल (सुमारे ३७ कि. मी.) अंतरावर असलेल्या 'चंद्रा' या गावी पाठवून दिले. या गावी येताच शिक्षणाची आबाळ राजेंद्रने भरून काढली. त्यासाठी त्याची कुशाग्र बुद्धीच कामी आली.

अभ्यासूवृत्ती, शीघ्र ग्रहणशक्ती, तीव्र स्मरणशक्ती यांच्या जोरावर एकेका वर्षात दोन-दोन इयत्ता पास केल्या. वयाच्या सतराव्या वर्षी म्हणजे १९०२ साली मॅट्रिक पास झाला. केवळ पास नाही तर बंगाल, बिहार, ओरिसा, आसाम, ब्रह्मदेश या राज्यांसाठी असलेल्या एकाच युनिव्हर्सिटीच्या 'मॅट्रिक' परीक्षेत वीस हजार विद्यार्थ्यांत प्रथम क्रमांक मिळविला. हा प्रथम क्रमांक आयुष्यात त्यांनी पुढे कधीही सोडला नाही.

राजेंद्रप्रसाद लहानपणी तालीम करीत. जोडो, मल्लखांब, कुस्ती ते शिकले. वडिलांप्रमाणेच घोड्यावर बसण्याचा त्यांना छंद होता. हुतूतू (कबड्डी) खेळ ते चांगला खेळत. पण पोहणे व झाडावर चढणे या गोष्टींची त्यांना खूप भीती वाटे. या दोन गोष्टी भीतीमुळे ते कधीच शिकू शकले नाहीत.

रात्री ते जास्त जागत नसत. रात्री नऊच्या पुढे जागणे त्यांना जमत नसे. जागून अभ्यास करायचा झाल्यास ते खोलीतल्या खोलीत फेऱ्या मारत वाचत असत. पण एकदा अशा फेऱ्या मारताच त्यांना झोप लागली आणि ते धाडकन् जमिनीवर कोसळले. रात्री जागत नसले तरी भल्या पहाटे उठत असत! 'लवकर नीजे, लवकर उठे! त्यासी धन, आरोग्य संपदा भेटे', अशी जुनी म्हण सकाळी आपल्याकडे प्रचलित होती. आपल्या सर्वोच्च पदवीच्या एम. ए. एम. एल. च्या अभ्यासाच्या वेळीही त्यांनी आपली ही सवय सोडली नव्हती.

१९०२ साली राजेंद्रप्रसाद कॉलेज–शिक्षणासाठी कलकत्ता येथे आले. कलकत्ता मोठे शहर. बंगालची राजधानी. मोठे रुंद रस्ते, उंच इमारती, दिव्यांचा झगमगाट. राजेंद्रप्रसादांना हे नवंच होतं. पहिल्यांदा हे पाहून ते दिपून गेले. त्याच्या आहारी मात्र गेले नाहीत. आपला अभ्यास भला की आपण, हाच नेम त्यांनी शेवटपर्यंत टिकविला. शहरातील कुठल्याही मोहाला बळी पडले नाहीत. शिक्षणात उत्तम यश मिळविणे हेच ध्येय त्यांनी ठेवले होते.

रसिकलाल राय नावाचे प्राथमिक शिक्षक होते. राजेंद्रप्रसादही त्यांच्याकडेच शिकले होते. त्यावेळी रसिकलाल राय गुरुजींनी त्यांना उपदेश

केला होता. "राजेंद्र, कलकत्ता हे मोठं शहर. तुला आकर्षित करणारी अनेक मोहजाल तिथं असतील. त्यांना तू भूलू नकोस. त्यांच्यापासून तू चार हात लांब रहा. खऱ्या खऱ्या विद्यार्थी धर्माचं पालन कर. आचरण कर. सर्वोत्कृष्ट यश मिळविणे हेच ध्येय ठेव."

राजेंद्रप्रसादाने हा उपदेश मनात पक्का कोरून ठेवला. आयुष्यभर तो तंतोतंत पाळला. आचरणात आणला. कॉलेजात जाताना इतरांप्रमाणे सूट-बूट असा इंग्रजी पोषाख स्वीकारला नाही. आपला नेहमीचा खेड्यातलाच पोषख कायम ठेवला. मुलांनी यामुळं प्रथम त्यांची टिंगल केली. पण शांत स्वभाव, अभ्यासूवृत्ती यामुळे पुढे ते सर्वांचे आवडते बनले. कॉलेजच्या संघटनेच्या चिटणीसपदी ते निवडूनसुद्धा आले.

☆ ☆ ☆

# ६. प्रेसिडेन्सी कॉलेजात

राजेंद्रप्रसाद कलकत्त्यात आले आणि त्यांनी तेथील प्रेसिडेन्सी कॉलेजात नाव घेतले. शहरी भुलभुलय्याला ते बिलकूल भुलले नाहीत. पण तेथील हिवतापाने त्यांना सोडले नाही. बराच काळ हिवतापाने आजारी होते. लवकर बरे होण्यासाठी त्यांनी कोयनेल घेतले. पण त्याचे प्रमाण जास्त झाले. त्याची वेगळी रिॲक्शन आली. दमा उद्‌भवला. या दम्याने शेवटपर्यंत त्यांना साथ केली.

या कॉलेजात अत्यंत विद्वान, हुषार प्राध्यापक होते. जगात नाव दुमदुमलेले. सर प्रफुल्लचंद्र राय, जगदीशचंद्र बोस हे रसायन व वनस्पतिशास्त्र शिकवीत होते. राजेंद्रच्या बुद्धिमत्तेने दोघांनाही वेधून घेतले. राजेंद्रवर दोघांचा लोभ जडला. डॉ. जगदीशचंद्र बोस रवींद्रनाथ टागोर यांचे मित्र होते. टागोरांप्रमाणेच देशभक्तही होते. पुढे दारूबंदी चळवळीत राजेंद्र-प्रसादांना त्यांची खूप आर्थिक मदत झाली.

या कॉलेजातील सर्वच प्राध्यापकांबद्दल राजेंद्रप्रसाद यांना आदर वाटायचा. "देशसेवेची प्रेरणा त्यांच्यापासूनच मी घेतली." असे ते म्हणत.

१९०६ साली राजेंद्रप्रसाद बी. ए. पास झाले. या युनिव्हर्सिटीच्या सर्व परीक्षांत ते पहिले आले होते. खूप बक्षिसे, मोठ्या रकमेच्या शिष्यवृत्त्या त्यांनी पटकावल्या होत्या. घरचा शिक्षणावरील पैशाचा ताण कमी केला.

कॉलेजात असताना अभ्यासाशिवाय इतर उपयुक्त गोष्टीतही त्यांनी केल्या. अभ्यासांच्या पुस्तकांखेरीज इतर धार्मिक व सामाजिक विषयांची पुस्तके त्यांनी वाचली. कॉलेजच्या नियतकालिकांत मधून मधून लेख लिहिले, वादविवाद सभेत भाषणे केली. यामुळे सर्व विद्यार्थ्यांचे ते लाडके बनले आणि युनियनचे चिटणीसपद वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांनाच द्यायचे हा पायंडा मोडून खालच्या वर्गातील राजेंद्र-प्रसादच्या गळ्यात चिटणीसपदाची माळ घातली.

याच काळात विदेश गमन केलेल्या डॉ. गणेश प्रसादांच्या सन्मानार्थच्या मेजवानीला ते हजर राहिले व जुनी प्रथा मोडली. न पटणाऱ्या चालीरीतींपुढे मान न तुकविण्याचे धैर्य त्यांच्यात होते.

☆ ☆ ☆


## ७. नापास होईनच कसा !

राजेंद्रप्रसादांना आपल्या अभ्यासातील तयारीची व यशाची शंभर टक्के खात्री असायची. ते पहिल्या वर्षाला असतानाची ही गोष्ट आहे.

कॉलेजचे पहिले वर्ष पार पडले. परीक्षा झाल्या. निकालाचा दिवस उगवला. प्रिन्सिपॉल निकाल वाचू लागले. निकाल वाचताना राजेंद्र प्रसाद प्रारंभी कान देऊन ऐकत होते. पण प्रिन्सिपॉल पुढे पुढे वाचू लागले तसे राजेंद्रप्रसाद अस्वस्थ झाले. शेवटी निकाल वाचून संपला. राजेंद्र प्रसादांचे नाव वाचलेच गेले नव्हते.

आपले नाव चुकून वाचायचे राहिले आहे असे त्यांनी नम्रपणे प्रिन्सिपॉलच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केला. पण ते उलट रागावले, "तू नापास झाला असशील तर मी तुझे नाव कसे वाचणार?" त्यांनी रागातच प्रश्न केला.

राजेंद्रप्रसाद प्रिन्सिपॉलकडे संशयाने पाहू



प्रिन्सिपॉलसमोर आत्मविश्वासपूर्वक राजेंद्रने आपली बाजू मांडली.

लागले. तसे ते जास्तच भडकले. काही बोलण्यासाठी राजेंद्र तोंड उघडणार तोच ते गरजले, "तुला पाच रुपये दंड केला आहे, जा आता." राजेंद्रप्रसादांनी आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. तशी त्या प्रिन्सिपॉलच्या तळपायाची आग मस्तकात गेली. ते ओरडले– "तुला दहा रुपये दंड." पुन्हा राजेंद्रने बोलण्याचा प्रयत्न करताच ते ओरडले, "पंधरा रुपये दंड." शेवटी दंडाची रक्कम लिलावाप्रमाणे वाढत जाऊन पंचवीस रुपयांवर पोहोचली.

आपल्या यशाची राजेंद्रप्रसादांना खात्री होतीच. मग त्यांनी निकालासंबंधी कार्यालयात चौकशीस सुरुवात केली. थोड्या वेळात तपास केल्यावर कारकुनाच्या लक्षात चूक आली. राजेंद्राचे म्हणणेच खरे होते. निकालात त्यांचे नाव हवे होते. कारण ते नुसतेच पास झाले होते असे नव्हे तर सर्व विद्यार्थ्यांत पहिल्या क्रमांकाने पास झाले होते.

कारकुनाने प्रिन्सिपॉल साहेबांच्या लक्षात ही झालेली चूक आणून दिली. राजेंद्रप्रसाद समोर होतेच. प्रिन्सिपॉल साहेबांना हे कळताच त्यांचा चेहरा मात्र पाहण्यासारखा झाला होता. अर्थात लिलावाप्रमाणे वाढलेली दंडाची रक्कम माफ झाली हे सांगायला नकोच.

☆ ☆ ☆

# ८. कलकत्त्यात शिक्षणाबरोबरच

राजेंद्रप्रसाद कलकत्त्यास शिकत होते. याच वेळी राष्ट्रीय विचारांची ज्योत प्रज्वलित झालेली होती. स्वातंत्र्यासाठी काँग्रेसचे प्रयत्न चालू झाले होते. गरम डोक्याच्या, जहाल विचारांच्या तरुणांच्या मनात सशस्त्र क्रांतीचे विचार बळावत होते. इंग्रज शासनाशी संघर्ष सुरू झाले होते. सुरेंद्रनाथ बॅनर्जी व बिपीनचंद्र पाल यांनी बंगाल पेटवून उठवला होता. रवीन्द्रनाथ टागोर, राजा राममोहन राय हे आघाडीवर होते.

'युगान्तर', 'वंदे मातरम्' जहाल वृत्तपत्राद्वारे अरविन्द घोष तरुणांना प्रक्षुब्ध करीत होते. बंगालच्या फाळणीच्या विरोधात विलायती मालावर बहिष्कार पुकारण्यात आला. विद्यार्थी अशा चळवळीत उतरायचे. पण राजेंद्र प्रसाद मनाने शांत, वृत्तीने सात्त्विक, विवेकी बुद्धीचे. ते थंड राहिले. देशभक्तीच्या नावाखाली दरोडे, खून, दहशत त्यांच्या वृत्तीत बसणारे नव्हते. त्यांना मानवणारे नव्हते. शिक्षण सोडून चळवळीत भाग घ्यायचं त्यांनी टाळलं.

पण शिकता शिकता जमेल तेवढी देशसेवा करण्याचं त्यांनी स्वतः ठरविलं. त्यांनी स्वतः कधीही विलायती वस्तू वापरल्या नाहीत. शहरभर पसरलेल्या बिहारी विद्यार्थ्यांना एकत्र जमवून 'बिहारी क्लब' स्थापन केला. या क्लबमध्ये म. गांधी, सरोजिनी नायडू, भगिनी निवेदितासारख्या हिंदी तत्त्वज्ञानाशी व राजकारणाशी एकरूप झालेल्यांची भाषणे घडवून आणली. १९०६ साली बिहारी विद्यार्थ्यांची

कॉन्फरन्स भरविली. बिहारी स्टुडंट असोसिएशन स्थापन करून दरवर्षी अधिवेशने घेतली. या संघटनेनेच पुढील काळात अनेक राजकारणी भारताला दिले, तरुणांत राष्ट्रीय भावनांची जागृती झाली.

कलकत्त्याच्या वास्तव्यात शिक्षणाव्यतिरिक्त थोडीशी राजकारणातील कामगिरी, थोडीशी समाजसेवा केली. याचबरोबर खूप, चांगले असे बंगाली मित्र जोडले. बंगाली भाषेची माहिती करून घेतली. बंगाली संस्कृतीची ओळख करून घेतली. राजकारण आणि चालू असलेल्या चळवळीचं निरीक्षण केलं. त्यावर चिंतन केलं. या सर्व गोष्टींचा उपयोग त्यांना पुढील आयुष्यात निश्चितच झाला.

१९०६ साली कलकत्त्यात काँग्रेस अधिवेशन झाले. या अधिवेशनामध्ये स्वयंसेवक बनून ते उपस्थित राहिले. या अधिवेशनाचे अध्यक्ष होते पितामह दादाभाई नौरोजी. त्यांच्याच पुढाकाराने या अधिवेशनात स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व परदेशी मालावर बहिष्कार ही चतु:सूत्री सर्वानुमते मान्य करण्यात आली.

याच अधिवेशनात सरोजिनी नायडू, पं. मदन मोहन मालवीय, बॅ. महंमद अली जीना, लो. बाळ गंगाधर टिळक इ. पट्टीच्या देशभक्तांची, सर्वोत्कृष्ट वक्त्यांची भाषणे ऐकून राजेंद्रबाबूंनी देशसेवेची स्फूर्ती प्राप्त केली होती.

पुढच्या वर्षी म्हणजे १९०७ साली सुरत येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात काँग्रेसचे जहालमतवादी नेते लो. टिळक यांचे भाषण अत्यंत प्रभावी झाले. या भाषणाचा राजेंद्र प्रसादांवर तीव्र परिणाम झाला. टिळकांचा बाणेदारपणा व नि:स्पृहवृत्तीने ते भारावून गेले. टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप त्यांच्या मनावर पडलीच, पण टिळकांच्या ओजस्वी भाषणाने ते दिपून गेले.

लो. टिळकांचे जहाल लेख, त्याच्यासाठी त्यांना झालेली शिक्षा, लाला लजपतरायना झालेली शिक्षा, त्यांची निर्घृण हत्या इ. घटनांनी त्यांच्या मूळच्या कोमल मनाला धक्काच बसला. यामुळे अत्यंत शांतवृत्तीचे, मवाळ स्वभावाचे राजेंद्र प्रसाद एकदम जहाल विचारांचे बनले.

१९०७ सालीच राजेंद्रप्रसादांच्या वडिलांचे निधन झाले. सर्व नातेवाईक, मुले, लहान नातवंडे जवळ होती. राजेंद्र प्रसादांनी विलायतेला जाण्याचा विचार सोडला म्हणून वडिलांच्या शेवटच्या क्षणी तेसुद्धा त्यांच्याजवळ हजर राहू शकले. त्यांची जर वडिलांची अंतिम भेट त्या क्षणी घडू शकली नसती तर ही गोष्ट त्यांच्या मनाला कायमची लागून राहिली असती.

१९०५ साली इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र घेऊन ते पहिल्या वर्गात बी. ए. पास झाले. पण त्यात समाधान न झाल्याने पुन्हा इतिहास हा विषय घेऊन बी. ए. पास झाले. १९०७ साली वडिलांच्या देहावसानाचा परिणाम त्यांच्या मनावर झाला. नेहमीप्रमाणे चांगला अभ्यास होऊ शकला नाही. यामुळे १९०८ साली ते एम. ए. पास झाले, पण पहिल्या वर्गात येऊ शकले नाहीत.

या परीक्षेबरोबरच राजेंद्रप्रसाद यांचे विद्यार्थी-जीवन संपले व त्यांनी कलकत्ता सोडले.

☆ ☆ ☆

# १. विलायतेला जाण्याचा विचार

तो काळ भारतातील इंग्रजी शासनाचा होता. कॉलेजची शेवटची परीक्षा उत्तम गुणांनी पास होणारास परदेशात शिक्षणाची संधी मिळायची. आय. सी. एस. ची परीक्षा पास होऊन यायचे. साहजिकच प्रत्येक हुषार विद्यार्थ्याच्या मनात आय. सी. एस. होण्याची इच्छा असायची. ही परीक्षा पास होऊन येताच कलेक्टर किंवा कमिशनरची खूप मोठ्या पगाराची सरकारी नोकरी मिळायची. जीवनात रुबाब असायचा. सरकार दरबारी वजन असायचे.

राजेंद्र प्रसादांच्या मनावरसुद्धा या परीक्षेचा चांगला प्रभाव पडला होता. त्यांच्याही मनात आय. सी. एस. चे आकर्षण निर्माण झाले होते. त्यांनी आपल्या वडील बंधूंजवळ ही इच्छा बोलून दाखविली. धाकट्या भावाच्या सर्व इच्छा पुरवायच्या हे जणू मोठ्या भावाने व्रतच घेतले होते; त्यासाठी कितीही त्रास सोसायची, त्याग करायची त्यांची तयारी होती. मोठे भाऊ महेंद्र यांनी लगेच आपला होकार दिला.

वडील राजेंद्रला परदेशगमनास परवानगी देणार नाहीत, अशी खात्री असल्याने त्यांनी स्वतःच पैसे जमवायला सुरुवात केली. प्रथम वडिलांना वाईट वाटले. ते रागावतील, पण राजेंद्र परत आल्यावर थोड्या दिवसांत सर्व काही व्यवस्थित होईल, असा महेंद्रचा अंदाज होता यामुळे गुपचूपच राजेंद्रच्या जाण्याची तयारी सुरू होती.

पण शेवटी वडिलांपर्यंत ही बातमी पोहोचलीच. त्यांनी तार करून राजेंद्रला घरी बोलावून घेतले. प्रथम समजावून सांगून, नंतर थोडे रागावूनही काही उपयोग होत नाही असे पाहून शेवटी धाय मोकलून का होईना राजेंद्रला आपल्या विचारांपासून परावृत्त केले. मोठी बहीण भगवतीदेवीने तर त्याची चांगली खरडपट्टी काढली.

शेवटी कोमल मनाच्या राजेंद्रने पितृभक्तीमुळे आपला विचार बदलला. त्यांच्या परदेशगमनाच्या तयारीचा त्यांना काहीच उपयोग झाला नाही. पण त्यांच्या तयारीचा उपयोग मात्र त्यांचा एक मित्र शुकदेव यास चांगलाच झाला. त्यांच्या तिकिटावर शुकदेव परदेशात जाऊन आला.

झाले ते चांगले झाले. ते विलायतेत असते तर वडिलांच्या अंतिम क्षणी ते वडिलांना दुरावले असते. शिवाय भारत एका खंद्या नेत्यालाही मुकला असता.

☆ ☆ ☆

# १०. ना. गोखले यांची भेट

एम. ए. पास झाल्यावर राजेंद्र प्रसादांनी मुझफ्फरपूर येथे एका कॉलेजात प्रोफेसरची नोकरी स्वीकारली. पगार कमीच होता, पण त्या नोकरीमध्ये त्यांचे मन रमेना. शेवटी ती नोकरी सोडली. मग मोठे बंधू महेंद्र यांनी वकिली करण्याचा सल्ला दिला. या कामाची त्यांना आवड होती असे नाही. केवळ भरपूर पैसा कमविणे, स्वतःच्या आणि कुटुंबाच्या सुखात रमून जाणे, विलासात दंग होणे, त्यांना मान्य नव्हते. आपल्या हातून काही देशसेवा घडावी, असे त्यांना मनोमन वाटत होते. थोरल्या बंधूंच्या सल्ल्यानुसार त्यांनी वकिली सुरू केली, पण ते बेचैनच होते.

नेमके याच काळात नामदार गोखले कलकत्यात आले होते. गोपाळ कृष्ण गोखले हे प्रसिद्ध विचारवंत होते, समाजसेवक होते. त्यांनी पुण्यात 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया' नावाची संस्था स्थापन केली होती. त्यांच्या अप्रतिम बुद्धिमत्तेमुळे म. गांधीजीसुद्धा त्यांना आपले राजकीय गुरू मानीत होते. राजेंद्रप्रसादांच्या मनातसुद्धा गोखलेंबद्दल आदर होता. राजेंद्रप्रसादांच्या विचारांची घडी अजून बसत होती.

ना. गोखलेसुद्धा आपल्या संस्थेसाठी योग्य, हुशार, होतकरू कार्यकर्ते मिळविण्याच्याच दृष्टीने कलकत्यास आले होते. राजेंद्रप्रसादांबद्दल त्यांनी पुष्कळ चांगलं ऐकलेलं होतं. त्यांनी राजेंद्रप्रसाद यांना भेटीचं बोलावणं पाठवलं. त्यांचा प्रथम विश्वासच बसेना. पण खात्री पटल्यावर ते गेले. बाहेर जास्त थांबावे लागलेच नाही. भेटीस येणाऱ्या इतरांची वर्दळ चालू होती. तरीही गोखले यांनी प्रसादांना लगेचच आत बोलावले.



राजेंद्रांची गोखल्यांशी प्रथम भेट.

राजेंद्रप्रसाद आत गेल्यावर गोखलेंनी प्रथम उज्ज्वल यशाबद्दल अभिनंदन केले व पुढे आता काय करणार असा सवाल केला.

खरंतर मी आय. सी. एस. होणार होतो पण जमलं नाही. आता मी वकिली करणार आहे असे त्यांनी उत्तर दिले.

गोखले लगेच म्हणाले, "पण राजेंद्र, आपला देश परदास्यात आहे. या देशाची वकिली कधी कराल? या जनतेसाठी वकिली कधी कराल? तुमच्या वकिलीत तुम्ही खूप पैसा मिळवाल. घरदार, नोकरचाकर, मोटर-गाडी ठेवाल. स्वतःचा संसार अतिशय सुखाने कराल. पण या देशाचा संसार कुणी करायचा? त्यासाठी तुम्ही काय करणार आहात? याचे उत्तर मला द्या."

गोखलेंच्या या प्रश्नांची उत्तरे आता तरी राजेंद्रांकडे नव्हती. त्यांनी विचार केला, आपण देशासाठी वर्गणी देऊ शकू. ही देशसेवाच नव्हे काय? मग ते लगेच गोखलेंना म्हणाले,"मी घेईन देशाच्या सेवेची काळजी. माझ्या संसाराप्रमाणे पाहीन देशाचा संसार. देशसेवेच्या कार्यात यथाशक्ती मदत करीन."

गोखले गंभीरपणे म्हणाले, "यथाशक्ती नको सर्व शक्तिनिशी देशसेवा करणे आवश्यक आहे. घराला चोहोबाजूने आग लागली असता कोणी म्हणेल, की मी एकच बादली पाणी टाकीन तर त्याचा काही उपयोग होणार नाही. आग विझणार नाही. आपला देश सर्व बाजूंनी संकटात आहे. गुलामी, अज्ञान, गरिबी, जातीयता अशा सर्व संकटांतून देशाची सुटका करण्यासाठी कार्यकर्त्यांची जरुरी आहे. त्याच हेतूने भारत सेवक संघाची स्थापना केली आहे. आपल्यासारख्या हुशार, बुद्धिमान लोकांची गरज आहे, बोला राजेंद्रप्रसाद, तयारी आहे?"

राजेंद्रना काहीच सुचेना. डोक्यात विचारांचे काहूर उठले. 'देश हा देव असे माझा' या विचाराने मनात घर केलं. 'दुसऱ्यासाठी जगलास तर जगलास, स्वतःसाठी जगलास तर मेलास' हे वाक्य डोळ्यापुढे नाचू लागले. पण आई, मोठे बंधू, मोठी बहीण यांच्या सल्ल्याखेरीज कोणताही निर्णय न करण्याची राजेंद्रांची सवयच होती. गोखलेंनी अडचण ओळखली. ते म्हणाले, "तुम्ही यावर चांगला, खोलवर विचार करून निर्णय घ्या."

मोठे बंधू महेंद्र तर धाकट्या भावाच्या सर्वच इच्छा पूर्ण करीत. त्यामुळे या गोष्टीस त्यांचा विरोध शक्यच नव्हता. पण मोठी बहीण भगवती व्यवहारी होती. ती म्हणाली, "इकडं शेतीचं उत्पन्न कमी कमी होऊ लागलं आहे. तुझ्या भावाचा संसार, तुझा संसार यातील सगळ्या जबाबदाऱ्या वाढत आहेत; अशात तू पैसे ग्वायचे सोडून फकीर बनलास तर संसार कसा चालणार? काढून टाक डोक्यातून देशसेवेचे खूळ आणि मुकाट्याने आपल्या उद्योगाला लाग.

मोठ्या बहिणीचा आदेश राजेंद्रप्रसाद मोडू शकले नाहीत. ते एम. एल. ही वकिलीची सर्वोच्च परीक्षा पास झाले. डॉक्टरेटचीही पदवी मिळविली. कॉलेजमध्ये प्रोफेसर झाले. प्रिन्सिपॉल झाले. पाटणा, कलकत्ता हायकोर्टात वकिली केली, खूप नाव मिळविले. पण १९२० सालच्या देशभक्तीच्या वादळात त्यांनी वकिली सोडली आणि देशसेवेत पडले.

☆☆☆

## ११. म. गांधींचे दर्शन

लाला लजपतराय, लो. टिळक यांना सरकारने तुरुंगात डांबले. अरविन्द घोषांनी संन्यास घेऊन अध्यात्माचा मार्ग धरलेला. अशी मोठी नेते मंडळी दूर असल्याने चळवळ थोडी थंडावली होती. १९१२ सालाचे बांकीपूर येथील काँग्रेसचे अधिवेशन खूप लहान झाले. या अधिवेशनाचे वर्णन पंडित जवाहरलाल नेहरूंनी 'स्नेह संमेलन' असे केले. पण ही खरी वादळापूर्वीची शांतता होती.

१९१४ सालच्या पहिल्या महायुद्धात भारतीय माणूस इंग्रजांना मदत करण्यास स्वखुषीने पुढे येईना म्हणून जुलूम–जबरदस्ती सरकारने सुरू केली. अशात लो. टिळकांची मंडालेच्या तुरुंगामधून सुटका झाली. "युद्धात विजय मिळाल्याबरोबर स्वातंत्र्य देऊ, असे वचन सरकार देत असेल तर त्यांना मदत करू; नाही तर नाही," अशी टिळकांनी अट घातली. ती मान्य झाली नाही. मग टिळक पुन्हा देशजागृतीच्या कामास लागले.

फेब्रुवारी १९१६ मध्ये मवाळ पक्षाचे मुख्य आधारस्तंभ ना. गोपाळ कृष्ण गोखले यांचे निधन झाल्याने लो. टिळकांच्या जहाल चळवळीस जोर चढला. टिळकांनी मुस्लीम लीगला काँग्रेस चळवळीत सामील करून घेतले. त्यांच्याशी करार केला. या करारावर १९१६ च्या लखनौच्या काँग्रेस अधिवेशनात मान्यता देण्यात आली. त्याला 'हिंदु-मुस्लिम' ॲक्ट म्हणतात.

राजेंद्रप्रसादांच्या दृष्टीने याहीपेक्षा महत्त्वाची घटना या लखनौ अधिवेशनात घडली. महात्मा गांधींचे दर्शन प्रथमच येथे त्यांना घडले. आफ्रिकेतील शेतमजुरांच्या यशस्वी लढ्यानंतर म. गांधीजी भारतात आले होते. या अधिवेशनात त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

बिहार प्रांतातील प्रतिनिधी या अधिवेशनात गांधीजींना भेटले. निळीच्या शेतात काम करणाऱ्या मजुरांच्या दयनीय अवस्थेबद्दल गांधींना माहिती दिली. त्यांच्यावर होणाऱ्या जुलूम-अत्याचारांची माहिती दिली व अधिवेशनात निषेध ठराव मांडण्याची विनंती केली. पण लेखी पुराव्याशिवाय तसा ठराव मांडण्याचे गांधीजींनी स्पष्टपणे नाकारले. पण मी स्वतः येऊन परिस्थिति पाहीन व काय ते ठरवीन, असे म्हणाले.

☆ ☆ ☆

## १२. चंपारण्यातील शेतकऱ्यांसाठी चळवळ

चंपारण्य म्हणजे बिहार राज्यातला भाग हिमालयाच्या पायथ्याशी आहे. पूर्वी तिथे निळीची झाडे लावत. त्यापासून कपड्यांची नीळ बनविली जाई. त्या काही निळीला भरपूर मागणी होती. धंदा तेजीत चालत असे. हे मळेच्या मळे गोऱ्यांनी ताब्यात घेतले, शेतकऱ्यांना खंडाने देऊ लागले, खंडणी घेऊ लागले. शेतकऱ्यांना निळीची झाडे लावण्याची सक्ती करू लागले. कोणी नाकारले तर जबर शिक्षा करीत. नीळ स्वस्त विकत घेत. प्रत्यक्ष शेतकऱ्यांना काही फायदा होत नसे.

शेतकरी छळले जात. गांजले जात. दारिद्र्यात खितपत पडत. गोऱ्या अधिकाऱ्यांनी त्यांना जगणे अशक्य करून सोडले होते.

लखनौ अधिवेशनात कबूल केल्याप्रमाणे स्वतः गांधीजी चंपारण्यात पाहणीसाठी पोहोचले. शेतकऱ्यांना धीर आला. त्यांच्यामध्ये धाडस जागे झाले. जो तो गांधीजींजवळ दुःख सांगू लागला. गांधीजी कळवळले. आठ दिवसांच्या पाहणी दौऱ्यावर आलेले गांधीजी वर्षभर तेथे राहिले. राजेंद्र प्रसादही गांधीजींच्या पाठोपाठ तेथे पोहोचलेच होते. गुजराथचे गांधीजी बिहारच्या लोकांसाठी धावले व आपण मात्र काहीच करत नाही, याचा त्यांना खेद झाला. ते या मजुरांच्या तक्रारी नोंदवून घेऊ लागले. त्यांचे वकीलमित्रसुद्धा या कामात मदत करू लागले.

प्रथम या मजुरांना कोणी वालीच नव्हता. त्यांच्या हिताकडे कोणाचे लक्षच नव्हते. उलट साम्राज्याचे हस्तक व नोकर इंग्रजांच्या फायद्यासाठी त्यांना छळतच असत. मजुराच्या अहिताचे कायदे केले गेले. गांधीजींचे कार्य पाहता मोतीहारीच्या मॅजिस्ट्रेटने त्यांच्यावर संचारबंदीचा हुकूम बजावला. गांधीजींनी त्या अन्यायी हुकमाबद्दल व्हाईसरॉयना लिहिले व आफ्रिकेतील कार्याबद्दल मिळालेले कैसर-इ-हिंद हे पदक परत केले. गांधीजींना वेगवेगळ्या प्रकारे त्रास दिला जात होता, पण गांधीजी शांतपणे कार्य करीतच होते. राजेंद्र प्रसाद साथ देत होते. दोघेही डगमगले नाहीत. शेतकऱ्यांचे धैर्य वाढले. ते एकत्र आले. संघटित झाले. त्यांची शक्ती [illegible] [illegible] नमते घ्यावे लागले.

गांधीजींशी वाटाघाटी झाल्या. अन्याय दूर करण्याचे आश्वासन मिळाले. सक्तीची लागवड बंद झाली. मळेवाल्यांनी काढता पाय घेतला. या लढ्यात गांधीजींबरोबर राजेंद्रप्रसादांचे नाव सर्वत्र दुमदुमले.

या चळवळीने राजेंद्रप्रसाद पार बदलले. ते गांधीजींचे अनुयायी बनले. त्यांचा कर्मठपणा कमी झाला. गांधीजी जात-पात मानत नसत. राजेंद्र प्रसादांनी भेदाभेद सोडून दिला. यांच्या आचारविचारांत साधेपणा आला. भांडी घासणे, कपडे धुणे ही कामे ते स्वतः करू लागले.

त्यांच्या मनात देशसेवेची ज्योत येथेच प्रखरपणे पेटली हे विशेष. गांधीजींबरोबर येथे हिंडताना त्यांना गरिबी, दारिद्र्य, अज्ञान, व्यसनाधीनता, भूकमारी, रोग्रस्तता, अंधश्रद्धा या गोष्टींचा अनुभव आला. ते कळवळले. मग त्यांच्यासाठी काहीतरी केलेच पाहिजे, असे त्यांना वाटू लागले. गांधीजी येथून जातील, पण त्यांचे कार्य मी पुढे चालूच ठेवीन, असा त्यांनी निश्चय केला.

अन्यायाचा प्रतिकार आनंदाने व चिकाटीने करायचा धडा त्यांनी घेतला. राजकारण हे फावल्या वेळेचे व प्रसिद्धीचे साधन नाही. त्यासाठी स्वतःला संपूर्ण झोकून द्यावे लागते. लोकांशी समरस होण्याची ती एक संधी असते. सरकारपुढे गाऱ्हाणी मांडण्यासाठी पुरावे गोळा करावे लगतात. त्याची खात्री करून घ्यावी लागते. कार्यकर्ता व जनता यांच्यात संपर्क वाढवावा लागतो, असे अनेक धडे अप्रत्यक्षपणे राजेंद्रबाबूंना मिळाले व त्यांच्या मनाची तयारी पूर्ण झाली.

आपला विजय होताच प्रतिपक्षाबद्दल द्वेष वाटू नये; उलट त्यांच्यावर प्रेम करावे. त्याच्याशी मैत्री करावी. त्रास किंवा छळ आनंदाने सोसावा

हा धडाही त्यांना मिळाला. सत्याग्रहाचे तंत्र कळाले.

गांधीजींबरोबर प्रसंगी तुरुंगातही जायचे, पण त्यांना एकट्याला तोंडघशी पाडायचे नाही असा त्यांनी निश्चय केला.

ही चळवळ जास्त काळाची नव्हती, पण तिच्यात तडफ होती, चमक होती, नाट्यात्मकता होती. यातले मुख्य नायक गांधीजी होते. ५ उपनायक राजेंद्रप्रसादच होते. ते मनाने, वाणीने उच्चाराने, आचाराने 'प्रति-गांधी'च बनले मोतीलाल नेहरू म्हणूनच म्हणाले होते "राजेंद्रप्रसाद म्हणजे गांधीजींची शंभर टक्के प्रतिमा."

प्र. पं. सं. कों, ... विभाग.

# १३. 'खेडा'चा सत्याग्रह

राजेंद्रप्रसादांनी चंपारण्याच्या चळवळीत भाग घेतला. गांधीजींची भूमिका प्रमुख होती. हा लढा सत्याग्रहाने तसेच विधायक कामामुळे जिंकला होता. या दोन साधनांची शक्ती पुन्हा एकदा राजेंद्रबाबूंना पहायला मिळाली. गुजराथमधील खेडा जिल्ह्यात ही संधी आली. गांधीजींबरोबरच ते तेथे गेले होते.

इंग्रज सरकार शेतकऱ्यांच्या पिळवणुकीची संधीच पहात होते; नव्हे शोधून काढत होते. गुजराथमधील खेडा जिल्ह्यात त्यांनी हेच केले. शेतजमिनीची फेरपाहणी केली. मूळचा सारा कमी असल्याचे जाहीर करून सारा वाढविला. तो इतका जास्त होता, की शेतकऱ्यांना तो भरणे कठीण होते. शेतकऱ्यांनी तो देण्याचे नाकारले. गप्प बसले तर मग ते इंग्रजी शासन कसले. वाढत्या दरानेच सारा वसूल करायचा हा त्यांचा निश्चय होता. मग दडपशाही सुरू झाली. शेतकऱ्यांचा छळ आरंभिला. जुलूम सुरू केले.

ही गोष्ट गांधीजींना कळविण्यात आली. गांधीजींनी सर्व गोष्टींची माहिती घेतली. सारा वाढविण्यात अधिकाऱ्यांची चूक झाली आहे. त्यांनी चुकीच्या हिशोबाने सारा वाढविलं आहे ही गोष्ट गांधीजींनी शासनाच्या नजरेस आणून दिली. शासन ते मानेनाच. मग गांधीजींनी शेतकऱ्यांना सत्याग्रहाचा सल्ला दिला. त्याचं नेतृत्व स्वतः गांधीजींनीच केलं.

ते दिवस उन्हाळ्याचे होते. भर दुपारची वेळ. वाळू आग ओकत होती. गाईगुरं झाडाखाली शीतल छाया घेऊनही धापा टाकत होती. रस्त्यावर चिटपाखरूसुद्धा बाहेर पडायची हिम्मत करीना. अशा रणरणत्या उन्हात दोन माणसं झपाझप पावलं टाकीत पुढं पुढं चालली होती. त्यातली एक व्यक्ती म्हणजे गांधीजी आणि दुसरी व्यक्ती होती राजेंद्रप्रसाद. साराबंदीची घोषणा गांधीजींनी दिली होती. हा संदेश खेडा जिल्ह्यातील गावागावांत, खेड्याखेड्यांत पोहोचवायचा होता. याच कामासाठी ते दोघे हिंडत होते. गावन् गाव पिंजून काढत होते. गांधीजी अनवाणीच होते. गोखले वारल्यापासून



त्यांनी पायांत वहाणा घालणे सोडून दिले होते. तापल्या वाळूनेही आपले काम बजावले. त्यांचे पाय भाजले. चटके बसून बसून फोड आले. तिकडे लक्ष द्यायला गांधीजींना सवड कुठली होती? पण राजेंद्रप्रसादांच्या ते लक्षात आले. त्यांना ते पहावले नाही. त्यांनी चटकन आपल्या खांद्यावरचे उपरणे हातात घेतले. गांधीजींच्या समोरच अंथरले. त्यावर पाय ठेवून चालण्याची विनंती केली. पण गांधीजी कुठले ऐकणार. उलट ते म्हणाले, "देशकार्यात पैशाची आणि शरीराची [illegible]"

हा प्रसंग राजेंद्रप्रसादांच्या मनावर मोठा प्रभाव करून गेला. अजून वकिलीत रेंगाळणारे त्यांचे मन तिथून एकदम बाहेर पडले. वकिलीच्या कीर्तीचा, पैशाचा मोह झुगारून दिला. त्यांनी देशसेवेलाच वाहून घेतले.

ही दुसरी घटना. १९१४ साल. महायुद्ध सुरू झालेले. इंग्रजांनी भारतीयांना मदतीचं आवाहन केलं. भारतीयांनी चांगलाच प्रतिसाद दिला. पैसे दिले. सैनिक दिले. यामुळे इंग्रज आपल्याला आता स्वातंत्र्य देतील, ही वेडी आशा मनात होती; पण इंग्रज निघाले वस्ताद. त्यांनी

स्वातंत्र्य दिले नाही. फक्त थोड्या सवलती दिल्या. ही शासनाने आपली थट्टाच केली असे लोकांना वाटले. लोक भडकले. पण गांधीजींनी सर्वांना शांत केले. मिळतात त्या सवलती घेऊन व जास्तीसाठी पुढे भांडतच राहू, असे लोकांना सांगितले. पण इंग्रजांनी युद्ध काळातली सभाबंदी चालूच ठेवली. आता गांधीजीही चिडले. त्यांनी शासनाशी असहकार पुकारला. ६ एप्रिल १९१९ या दिवशी संपूर्ण देशात हरताळ पाळण्यात आला. राजेंद्रप्रसादांनी आपल्या पाटणा शहरात हरताळ शंभर टक्के यशस्वी करून दाखविला. यावेळी गांधीजींच्या सांगण्याप्रमाणे स्वतः अहिंसेने वागण्याची शपथ घेतली होती. देशात, बाकी थोड्याफार ठिकाणी थोड्या प्रमाणात दंगेधोपे झालेच. पण पाटण्यात सारे कसे शिस्तीत पार पडले. संपूर्ण काळात शांतता नांदली. गडबड नाही, दंगा नाही, भांडणतंटा नाही. या यशामुळे राजेंद्रप्रसादांचे नाव संपूर्ण देशभर प्रसिद्ध झाले.

टिळक फंडासाठी व काँग्रेस सभासद नोंदविण्यासाठी राजेंद्रप्रसाद यांनी सारा बिहार पायाखाली घातला. पाच-पाच हजारांच्या जमावापुढे लाऊडस्पीकरशिवाय भाषणे केली. दिवसात चार-चार सभा घेतल्या. आठ लाख रुपये गोळा केले. जनतेत जागृती निर्माण केली.

☆ ☆ ☆

## १४. यापुढे वकिली नाही

गांधीजींचे लढे यशस्वी होत होते. गांधीजींचा प्रभाव जनमानसावर वाढत होता. तसतसे इंग्रजांचे माथे ठणकत होते. पित्त खवळत होते. तळपायाची आग मस्तकात जात होती. शासनाची-इंग्रजी अधिकाऱ्यांची अवस्था एखाद्या माथेफिरू पिसाट खुन्यासारखी झाली.

भारतीय संघटित होऊन दाद मागू लागले की इंग्रजांची शीरच उठे. मग ते भल्याबुऱ्या मार्गाने बिमोड करण्याचा चंग बांधत. गांधीजींना मिळत असलेल्या यशामुळे डायर-ओडवायर हे अधिकारी चवताळून उठले होते.

त्या दिवशी जालियनवाला बागेत लोक जमले होते, इंग्रजांच्या काळ्या कायद्याच्या निषेधाची सभा तेथे होणार होती. या बागेच्या मैदानातून बाहेर पडायला दोनच दरवाजे होते. पैकी एक कायमचा बंद केलेला. दुसरा फक्त सहा फुटी बोळवजा. लोक जमले आहेत. काही जण इंग्रजांविरुद्ध बोलताहेत. लोक ऐकताहेत हे डायर अधिकाऱ्यास कळाले.

सैतानसुद्धा प्रेमळ वाटावा असा रागीट व क्रूर स्वभावाचा डायर होता. जीपमध्ये बसला. दोन तुकड्या सैन्याच्या घेतल्या. बाहेर पडण्याच्या एकमेव मार्गावर त्यांना उभे केले. प्रचंड गोळीबार केला. कोपऱ्यातील विहिरीत पडून पळताना अनेकजण मेले. जाताना तेथे गस्त ठेवली. जखमी किंवा मृतांजवळ कोणालाच अगदी नातेवाइकाला-सुद्धा जाऊ दिले जात नव्हते. एकूण १५५६ भारतीयांचा निर्घृणपणे बळी येथे घेतला गेला.

भारतीय जनतेला चांगली जरब बसावी म्हणून जनरल डायर व ओडवायर या अधिकाऱ्यांनी या जालियनवाला बागेत जमलेल्या लोकांपैकी गोळीबारातून वाचलेल्या लोकांना पोटावर सरपटत जाण्याची अतिशय अपमानकारक शिक्षा केली.

ही घटना राजेंद्रप्रसादांना कळाली. ते अतिशय संतापले. त्यांचे मन रागाने तप्त झाले. त्यांनी जुलमी इंग्रज सरकारशी लढा देण्याचा निश्चय केला. चंपारण्यभागातून कायदे कौन्सिलमध्ये निवडून येण्याचा विचार सोडून दिला. हातातील महत्त्वाचे खटले पूर्ण केले. किरकोळ खटले अन्य वकिलांकडे दिले. काहींची फी परत केली आणि त्यांनी वकिली सोडली. मनात प्रतिज्ञा केली, 'यापुढे मी वकिली करणार नाही.' यावेळी थोरल्या बंधूंचाही सल्ला त्यांनी घेतला नाही.

☆ ☆ ☆

# १५. सदाकत आश्रमाची सुरुवात

लो. टिळकांची वास्तववादी दृष्टी आणि व्यवहारकुशलता याबद्दल राजेंद्रप्रसादांना आदर होता. पण शत्रूशीसुद्धा वागताना नेहमी सत्याचाच अवलंब केला पाहिजे, हे गांधीजींचे म्हणणे जास्त पटत असे. पुष्कळ वेळा त्यांच्या मनाची द्विधा अवस्था होत असे.

पण १९२० साली लो. टिळकांचा मृत्यू झाला. मृत्यूआधी दहा दिवसच टिळक गांधीजींना म्हणाले होते, 'तुमचे माझे सत्याग्रहाबाबत जरी जुळले नाही तरी तेवढ्यामुळे मी तुमच्या मार्गात अडथळे किंवा अडचणी आणणार नाही. तुमचाच मार्ग जर लोकांना जास्त आवडला तर मीसुद्धा तुमच्याच मार्गाचा अवलंब करीन.' टिळकांच्या या प्रांजळपणाचा राजेंद्रप्रसादांच्या मनावर फारच मोठा परिणाम झाला असावा.

यानंतर सत्याग्रह हेच चळवळीचे प्रमुख साधन बनले. त्यामुळेच त्यात समाविष्ट होणाऱ्या सर्व बाबींकडे राजेंद्रप्रसादांचे लक्ष वेधले गेले. त्यांनी आपल्या बिहार प्रांतात राष्ट्रीय शिक्षणाची सुरुवात, त्याचा प्रचार व प्रसार करण्याचे ठरविले. त्या काळात चालू असलेल्या सरकारी व निमसरकारी शाळा बंद करून त्यांची जागा राष्ट्रीय शाळा-कॉलेजांनी घेतली पाहिजे, असा त्यांनी विचार केला. मग राजेंद्रप्रसादांनी राष्ट्रीय शाळा काढण्याचा उपक्रम सुरू केला. आपल्या बिहार प्रांतात त्यांनी दोनशे प्राथमिक शाळा, पन्नास हायस्कूले स्थापन केली. पाटण्यात राष्ट्रीय कॉलेज काढले. लोकांच्या आग्रहावरून ते त्या कॉलेजचे प्रिन्सिपॉल बनले.

राष्ट्रीय कॉलेजचे पुढे राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करण्याची योजना म. गांधीजींच्या इच्छेवरून तयार केली. गांधीजींनी स्वतः पन्नास हजार रुपयांची मदत या कार्यासाठी मिळवून दिली.

राजेंद्र प्रसादांचे अगदी जवळचे व आवडते एक मित्र होते. त्यांचे नांव बॅ. मझरूल हक. ते राजेंद्रप्रसादांचे मार्गदर्शकही होते. विद्यापीठ काढण्यासाठी त्यांनी मोठा निधी तर उभा

केलाच, पण त्याचबरोबर पाटणा शहराजवळची एक मोठी जमीन व तिच्यावर बांधलेला मोठा बंगलाही देणगी म्हणून देऊन टाकला. या बंगल्याचे नाव होते, 'सदाकत मंझील'. राजेंद्रप्रसादांनी नाव पूर्ण न बदलता त्याचे नाव केले, 'सदाकत आश्रम' सदाकत म्हणजे सत्य. नाव पूर्ण न बदलण्यात राजेंद्रप्रसादांनी फारच औचित्य साधले.

या कृतीतून मित्रप्रेम तर दिसलेच, शिवाय फारशी व संस्कृत या दोन्ही भाषांचा समन्वय साधून त्या भाषांबद्दल आदरही व्यक्त केला.

राष्ट्रीय कॉलेजचे स्थलांतर येथे करण्यात आले व प्रिन्सिपॉलांचे म्हणजेच राजेंद्रप्रसादांचे निवासस्थान येथेच करण्यात आले. पुढे ते पंचवीस वर्षे तेथे राहिले. भोवती दाट आंब्याची झाडे लावली. त्यामुळे एकेकाळचे हे ओसाड माळरान ऋषी-मुनींच्या तपोवनातील आश्रमासारखे वाटू लागले.

राष्ट्रीय उच्च शिक्षणाबरोबरच शिक्षणाचे माध्यम कोणते असावे, याबाबतही त्यांनी विचार केला. त्यासंबंधी सखोल अभ्यास करून आपले मत बनविले. यातून त्यांची दूरगामी दृष्टी व कौतुकास्पद विचारांची झेप दिसून येते.

विद्यार्थ्यास कोणत्याही विषयाचे खरे व मूलगामी ज्ञान होण्यासाठी त्याला त्याच्या मातृभाषेतूनच शिकविले पाहिजे, हे त्यांचे मत होते. प्रांताची भाषा हीच शिक्षणाची भाषा इंग्रजीऐवजी झाली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. तसेच प्रांताप्रांतांतील सहकार्य व दळणवळणासाठी हिंदी लोकांना हिंदी भाषा आली पाहिजे असेही त्यांनी स्पष्ट केले. परंतु जगाच्या वाङ्मयात इंग्रजीचे स्थान उच्च आहे. आंतरराष्ट्रीय भाषा होण्याचे इंग्रजीचे सामर्थ्य आहे. स्पर्धात्मक परीक्षांसाठी इंग्रजीचाच वापर होतो, हे पाहता शिक्षणातून सध्यातरी इंग्रजी भाषेचे पूर्णपणे उच्चाटन करणे शक्य नाही. ती दुय्यम भाषा म्हणून तरी ठेवली जावी, असे मत त्यांनी व्यक्त केले.

☆ ☆ ☆

## १६. आधी केले, मग सांगितले !

टिळकांच्या मृत्यूनंतर म. गांधी एकमेव पुढारी बनले. १९२० च्या नागपूर येथील काँग्रेसच्या अधिवेशनात त्यांनी आपल्या असहकारितेच्या धोरणाचा ठराव पास करून घेतला. यामुळे बॅ. जिनांसह सर्व मवाळ काँग्रेसमधून बाहेर पडले. पण गांधीजी डगमगले नाहीत. ते काँग्रेसचे सभासद वाढविण्याच्या कार्याला लागले. थोड्या दिवसांतच त्यांनी एक कोट सभासद नोंदविले. तसेच लो. टिळकांच्या स्मारकासाठी एक कोट रुपये निधी जमा केला.

जनसंपर्क व लोकजागृतीसाठी गांधीजींनी देशभर दौरे केले. राजेंद्रप्रसादांनीही बिहार प्रांतात दौरे काढून सभासद वाढविले. गांधीजींच्या टिळक फंडाला सात-आठ लाख रुपये जमवून दिले. यावेळी त्यांनी बिहारच्या कानाकोपऱ्यांतून, नद्या-नाल्यांतून, रानावनातून, उन्हातान्हात, रात्री-

अपरात्री, कधी घोड्यागाड्यांमधून तर कधी पायी, अनवाणीसुद्धा प्रवास केला. याच दौऱ्यात मोठमोठ्या सभांतून भाषणे करण्यास ते शिकले. सरकारी मानसन्मान व पदव्या सोडण्याच्या धोरणाप्रमाणे त्यांचे बंधू महेंद्र यांनी 'रायसाहब' ही सरकारकडून मिळालेली पदवी परत केली. तसेच 'चद्रा' म्युनिसिपालिटीची व्हाईस चेअरमनची जागासुद्धा सोडून दिली. राजेंद्रप्रसादांनी आपल्या पुतण्यांना सरकारी हायस्कूल व बनारस विश्वविद्यालयातून काढून घेतले.

गांधीजींच्या विधायक कार्याची दृष्टीही राजेंद्रप्रसाद यांच्याजवळ होती. ते खादीचा प्रसार करण्यासाठी देशभर हिंडले. 'चरखा संघ' स्थापन केले. हिंदी प्रसारातही ते अग्रभागी राहिले. राष्ट्रभाषा सभेच्या मोठमोठ्या पदांची जबाबदारी त्यांनी सांभाळून राष्ट्रभाषेची मोठीच सेवा केली. गांधीजींच्या नशाबंदी या चळवळीत भाग घेऊन दारूबंदी, अफूबंदी, गांजाबंदी या चळवळी यशस्वी केल्या.

अशा तऱ्हेने काँग्रेसने पास केलेल्या ठरावांचे राजेंद्रप्रसाद व त्यांच्या बंधूंनी प्रथम पालन केले, मग या धोरणांचा प्रसार व प्रचार बिहारमध्ये सर्वत्र केला. त्यांनी 'आधी केले मग सांगितले' केवळ 'लोका सांगे ब्रह्मज्ञान' असे त्यांचे नव्हते. त्यामुळेच लोकांच्या मनावर त्यांचा प्रभाव अधिक चटकन व अधिक खोलवर पडला.

याच वेळी राजेंद्रप्रसादांनी हिंदीमधील 'देश' व इंग्रजीमधील 'सर्च लाईट' ही दोन वर्तमानपत्रे चालविण्यास घेतली. त्याच वर्तमानपत्रामधून काँग्रेस मतप्रणालीचा प्रसार त्यांनी केला. आता त्यांचा सगळा वेळ कॉलेजवर देखरेख करणे,



**राजेंद्रबाबूंनी लोकजागृती करून, दारूबंदी यशस्वी केली. आपसांत भांडणे मिटविली.**

वर्तमानपत्रांचे संपादन करणे व ग्रामसंगठण करणे या तीन कामांतच जाऊ लागला.

लोकजागृतीच्या कार्यामुळे लोक उत्साही, साहसी, निर्भय बनले. देशासाठी त्याग करायला तयार झाले. दारूबंदीच्या यशामुळे शासनास नुकसान होऊ लागले.

त्यांनी ग्रामपंचायतींची स्थापना केली व ग्रामस्थांची भांडणे, तंटे-बखेडे ग्रामस्थांमार्फतच सोडविण्यास सुरुवात केली. यामुळे कोर्टातील खटले तोडण्याचा उपक्रम सुरू झाला. पण इंग्रज सरकारच्या जबरदस्त जुलूम व दडपशाहीमुळे पुढे त्यांची ही पद्धत बंद पडली.

दंगलीच्या काळात शांतता स्थापन करण्यासाठी गांधीजींनी देशभर 'सेवक-दले' स्थापन केली. राजेंद्रप्रसाद यांनीही बिहारमध्ये सेवकदल स्थापन केले व स्वतः त्याचे एक सेवक बनले.

१९२२ च्या अधिवेशनानंतर गांधीजींनी देशभर सत्याग्रह करण्याचे ठरविले. पण संयुक्त प्रांतात 'चौरी-चुरा' खेड्यात लोक पोलिसांच्या दंगलीने बिथरले. त्यांनी पोलिस ठाणे पेटवून दिले. तसेच वीस पोलिसांना जिवंत जाळून टाकले. आपल्या अहिंसा तत्त्वाविरुद्ध घडलेली ही घटना गांधीजींना कळाली. त्यांनी क्षणात सत्याग्रहाची चळवळ थांबविली. त्यामुळे जनता नाराज झाली. अन्य नेत्यांचा गांधीजींच्या नेतृत्वावरचा व व्यवहारीपणावरचा विश्वास डळमळू लागला. यामुळे राजेंद्रप्रसादही नाराज झाले व विचारात पडले.

पण गांधीजी म्हणाले, "सत्याग्रह सध्या पचणारे शस्त्र नाही. त्याचा उपयोग संयमाने व चाणाक्षपणे केला पाहिजे. नाहीतर त्याचा परिणाम उलटा झाल्यशिवाय राहणार नाही. सत्याग्रहाचा पूर्ण विचार झाल्यावरच उपयोगात आणावा. खोट्या जिद्दीला बळी पडून आत्मघात व देशघात करू नये." राजेंद्रप्रसादांना हा युक्तिवाद पटला व गांधीजींनी बरोबरच केले असे त्यांचे मत झाले.

☆ ☆ ☆

## १७. अशी जनसेवा

म. गांधीजींनी काँग्रेस सभासद वाढविणे, खादीप्रसार व प्रचार, खादी वापराचा प्रसार, अस्पृश्यांचे संघटन, त्यांच्या मंदिर-प्रवेशाचा हक्क, दारूगुत्त्यावर निरोधने, जातीजातींतील ऐक्य भावनेची वाढ इ. चळवळी आक्रमकपणे चालू ठेवल्या. याबद्दल गांधीजींची तुलना टिळकांशी करून तितकीच म्हणजे सहा वर्षांची शिक्षा सुनावली. हा खटला अहमदाबादेत चालू असता राजेंद्रप्रसाद तेथेच होते. निकाल ऐकून त्यांच्या डोळ्यातून अश्रूंचा पूर वाहू लागला.

१९२४ साली बिहारमधील छपरा जिल्ह्यात चपळाईने कार्य करून पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी समिती स्थापन केली. १९३४ साली बिहारमधल्या भूकंपात तर स्वतःच्या जीवाचीही पर्वा केली नाही. त्यांचा दमा बळावल्याने सरकारने बांकीपूरच्या तुरुंगामधून त्यांची सुटका केली. पण तेथेच त्यांना भूकंपाची बातमी कळली. विश्रांतीची किंवा आजाराची पर्वा न करता खाटेवर पडल्या पडल्या ते मदत कार्याची सूत्रे हलवू लागले.

केवळ दहाच दिवस ते खाटेवर पडून राहिले. अकराव्या दिवशी ताडकन् उठले. बिहारचा झंझावाती दौरा केला. मदतीसाठी एक कमिटी स्थापन केली. जनतेचे अश्रू पुसून त्यांना बघता बघता हसावयास लावले. यासाठी हजारो कार्यकर्ते त्यांनी हाताशी धरले होते.

यानंतर त्यांनी अनेक नेत्यांबरोबर देशभर दौरे केले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा त्यांनी गांधीजींचे तत्त्वज्ञान व त्यांच्या चळवळीवरची आपली निष्ठा कधीच सोडली नाही.

१९२४ साली पुढाऱ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांत प्रवेश करण्याचे ठरले तेव्हा राजेंद्रप्रसाद पाटणा म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष बनले. १९२५ साली चरा संघात राजेंद्रप्रसाद नेमले गेले. त्यावेळी त्यांनी खादीचे तंत्र सुधारणे, दर्जा सुधारणे, उत्पादन वाढविणे, खादी उत्पादनाचे शिक्षण देणे, खादी केंद्रे काढणे, खादीची प्रदर्शने भरविणे, व्यापारी तत्त्वाने खादीची विक्री करणे इ. गोष्टींकडे लक्ष दिले. यासाठी धंद्याचे संपूर्ण ज्ञान स्वतः करून घेतले. पुढे याच ज्ञानाच्या बळावर त्यांनी 'खादीचे अर्थशास्त्र' नावाचे पुस्तक लिहिले.

वकिली सोडताना त्यांच्याकडे एक दावा असा होता की, तो त्यांना स्वतः चालविणे आवश्यक होते. त्यासाठी त्यांना इंग्लंडला जावे लागले. ते पूर्ण शाकाहारी होते. म्हणून त्यांनी आपल्याबरोबर आचारीच नेला. गांधीजींचा आशीर्वाद घेतला. १९२८ साली ते इंग्लंडला गेले त्यांचा तेथील नेमलेला जोडीदार वकील त्यांच्या तयारीवर खूष झाला. या खटल्यात तडजोड झाली. राजेंद्रप्रसादांचे श्रम सार्थकी लागले. खटल्याचा निकाल एक महिना आधीच लागला. मग एक महिना युरोपात इंग्लंडबाहेर राहून युद्धविरोधी चळवळीचे त्यांनी निरीक्षण केले.

तेथे गांधीजींचे अहिंसा तत्त्वज्ञ आचरणारे प्रसिद्ध तत्त्वज्ञ व विचारवंत रोमा रोलॉ यांची त्यांनी भेट घेतली. तसेच म्युनिक येथील युद्धविरोधी तुरुंगाच्या बैठकीला ते हजर राहिले. जर्मनीत लायझिंग येथे डॉ. कुन्हे यांना भेटून निसर्गोपचार पद्धती व सातत्यादी स्नान पद्धतीचा अभ्यास केला.

भारतात जेव्हा सायमन कमिशनचे आगमन झाले तेव्हा त्याच्या विरोधात भारतात सर्वत्र निदर्शने झाली. पण पाटण्यात राजेंद्रप्रसादांच्या नेतृत्वाखाली जी शांततापूर्ण अशी निदर्शने झाली तशी कोठेच झाली नाहीत.

राजेंद्रप्रसादांची काँग्रेसवर निस्सीम भक्ती होती. म्हणून ते तीन वेळा काँग्रेसचे अध्यक्ष झाले. प्रत्येक वेळी अध्यक्षपदासाठी वाद व्हायचा व राजेंद्रप्रसादांची तेथे नेमणूक व्हायची. १९३४ साली असेच झाले. त्यावेळी गांधीजींनी काँग्रेसचा राजीनामा दिला. पण राजेंद्रप्रसादांनी तुफानी दौरे देशभर काढून कामगिरी यशस्वी केली. १९३९ साली सुभाषबाबूंनी अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला व राजेंद्रप्रसादांनी काँग्रेस नौकेचे सुकाणू सांभाळले. १९४७ साली आचार्य कृपलानी यांनी अध्यक्षपद सोडले. त्यावेळी सर्वानुमते पुन्हा राजेंद्रप्रसादांनाच अध्यक्ष बनविले गेले.

☆ ☆ ☆

## १८. निग्रही सत्याग्रही

राजेंद्रप्रसाद तसे मूलतः अत्यंत मृदू स्वभावाचे होते. तरी अत्यंत कर्तव्यकठोर होते. वेळ पडताच वज्रापेक्षाही अत्यंत जास्त कठोरता त्यांच्या स्वभावात येत असे. निर्भयता तर त्यांच्या रक्तातच भिनली होती. १९३० साली म. गांधींनी मिठाचा सत्याग्रह केला. राजेंद्रप्रसाद यांनीही त्यात भाग घेतला होता. चंपारण्यात करबंदीची चळवळ तर त्यांनी स्वतःच चालविली. सरकारने लोकांचा अनन्वित छळ केला. जप्त्या आणल्या, लाठीमार केला, गोळीबार केला, सत्याग्रहींना तुरुंगात डांबले. पण राजेंद्रप्रसादांनी धीर सोडला नाही. यश मिळेपर्यंत पाय मागे घेतला नाही.

एकदा पाटण्यात सरकारने मिरवणुकीवर बंदी घातली. तरीही राजेंद्रप्रसादांनी मिरवणूक काढलीच. सर्वांत पुढे ते स्वतः चालत होते. गोऱ्या सार्जंटने त्यांच्या अंगावर घोडा घातला. पण ते कुठले मागे हटताहेत? लाठीचे तडाखेसुद्धा त्यांनी शांतपणे सहन केले. विहपूर येथील सत्याग्रहातही त्यांना लाठीमार सहन करावा लागला होता; १९३० व १९३२ साली ते सहा-सहा महिने तुरुंगातही होते. १९३३ साली त्यांना पंधरा महिने तुरुंगवास झाला. तर १९४२ मध्ये चार-साडेचार महिने कैदेची सजा भोगली. तुरुंगातसुद्धा ते आदर्श सत्याग्रह्यासारखे वागत असत.

ते तुरुंगातसुद्धा अगदी काटेकोरपणे वागत. तुरुंगातील सर्व अधिकाऱ्यांना त्यांच्याबद्दल आदर वाटायचा. ते अधिकारी राजेंद्रप्रसादांना वेगवेगळ्या कमीअधिक सवलती देण्याचा प्रयत्न करायचे. पण कधीही व कुठेही नियमबाह्य सवलत किंवा मदत राजेंद्रप्रसादांनी स्वीकारली नाही.

एकदा तुरुंगात असताना गांधीजींच्या विचारांचा संग्रह करण्याची कल्पना त्यांच्या डोक्यात आली. त्यासाठी खूप पुस्तके वाचावी लागणार होती. त्यांनी एक भली मोठी यादी करून ती जेलरला दिली. कैद्याला एकावेळी एकच पुस्तक देतात, हा नियम त्यांना माहीत नव्हता. जेलरने ती यादी पाहिली. राजेंद्रप्रसादांनी हे काम आपल्याला सांगितले याचा कितीतरी आनंद जेलरला झाला. अभिमानसुद्धा वाटला. जेलरने त्वरित सगळी पुस्तके आणून त्यांना दिली. राजेंद्रप्रसादांच्या नंतर जेव्हा आपल्या हातून नियम मोडल्याचे लक्षात आले तेव्हा त्यांना खूप वाईट वाटले. पुढे ते हस्तलिखित गहाळ झाले. तेव्हा हळहळण्याऐवजी ते म्हणाले, 'बरे झाले.'

☆ ☆ ☆

## १९. त्यांची ही काळजी

५ मे १९३०. धरिसाना मिठाचा डेपो ताब्यात घेतल्याबद्दल गांधींना अटक करून चौकशीविना स्थानबद्ध करण्यात आले. यामुळे सर्वत्र पुन्हा जोरात चळवळ सुरू झाली. बिहार प्रांताला समुद्रकिनारा नाही तेथे मिठाच्या सत्याग्रहास जोर येणे अशक्य होते. क्षारयुक्त जमिनीच्या मातीतून थोडे मीठ बनविण्याचा लाक्षणिक सत्याग्रह येथे झाला. राजेंद्रप्रसादांनी

मीठ तयार केले नाही पण बनविलेले मीठ विकण्यात सहभाग घेतला.

पोलिसांना हे कळूनही त्यांना पकडले नाही. राजेंद्रप्रसाद खरोखरच सत्याग्रही आहेत. अहिंसा तत्त्वावर त्यांची नितांत श्रद्धा आहे. ते अहिंसेचे उपासक आहेत. त्यांना अटक करण्यापेक्षा मोकळे ठेवण्यातच सरकारचा फायदा आहे, असा विचार त्यावेळी पोलिस अधिकाऱ्यांनी केला. कारण बिहारमध्ये सायमन कमिशनच्या विरोधात निदर्शने करताना तणावपूर्ण स्थितीतही त्यांनी जी शांतता टिकविली, संतप्त जमावावर नियंत्रण ठेवून त्यांना शांत केले हे त्या अधिकाऱ्यांना माहीत होते. राजेंद्रप्रसाद या अधिकाऱ्यांशी सहानुभूतीने व सभ्यतेने वागत असत. मग ते अधिकारीही राजेंद्रप्रसादांशी आदराने व आदबीने वागत.

पोलिस अधिकारीसुद्धा त्यांना कशी मदत करत याचे एक उदाहरण म्हणून एक प्रसंग सांगता येईल.

एकदा राजेंद्रप्रसाद भाषणासाठी दौऱ्यावर निघाले होते. पोलिससुद्धा एका मोटारमधून त्यांच्या मागेच होते. अचानक रस्त्यात राजेंद्रप्रसादांची मोटार बिघडली. लवकर दुरुस्त होण्याची चिन्हे नव्हती. व्याख्यानाचे जागी वेळेत तर जायला हवे होते. शेवटी पाठलाग करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांनीच त्यांना आपल्या मोटारीत घेऊन व्याख्यानाचे जागी वेळेवर पोहोचविले.

पोलिस अधिकारी राजेंद्रप्रसादांना आदर द्यायचे. कारण राजेंद्रप्रसादसुद्धा य अधिकाऱ्यांच्या काही बाबतीत विशेषतः धार्मिक भावनांबाबत जास्त दक्ष राहत. पोलिसखात्यात ख्रिश्चन, मुसलमान लोकांचे प्रमाण जास्त होते. मुस्लीमांना नमाजासाठी शुक्रवारी मशिदीत जावे लागे, तर ख्रिश्चनांना गुडफ्रायडेची प्रार्थना चुकवायची नसते हे लक्षात घेऊन राजेंद्रप्रसाद आपले दौरे, भाषणे, व्याख्याने या दिवशी ठेवत नसत. अशा धार्मिक प्रवृत्तीच्या परोपकारी राजेंद्रप्रसादांना पोलिस कसलाही त्रास होऊ नये याची दक्षता घेत असत.

☆ ☆ ☆

## २०. मी त्यांच्यातलाच एक

बिहारात मिठाच्या सत्याग्रहास जोर येणे शक्य नव्हते. मग स्वयंसेवकांनी विलायती कापडाच्या दुकानावर व गांजाच्या दुकानावर निरोधनासाठी मोर्चे काढले. कापडाच्या व्यापाऱ्यांनी विक्री बंद केली. गांजाचे व्यापारी ऐकेनात. तिथे निरोधनाला जोर चढला. मग पोलिसांनी मोठ्या प्रमाणात अंदाधुंद धरपकड केली. एके ठिकाणी मोठ्या जमावावर लाठी-हल्ला झाला.

लाठीहल्ल्याच्या जागी लोकांना शांत करण्यासाठी राजेंद्रप्रसाद गेले. पण पोलिसांना धुंदी चढलेली. त्यांनी राजेंद्रप्रसादांवरच लाठ्या चालविल्या. पाच-सहा लाठ्यांचा वार झाल्यावर रामगटीसिंग नावाचा स्वयंसेवक धावत येऊन त्यांच्या अंगावर आडवा पडला व पुढचे सर्व वार स्वतः झेलून आपल्या नेत्याचे रक्षण केले.

राजेंद्रप्रसादांना पकडण्यात आले. चौकशीसाठी चद्रा येथील तुरुंगात ठेवण्यात



**बिहारच्या सत्याग्रहात राजेंद्रप्रसादांचा लाठीमार वाचविणारा एक स्वयंसेवक**

आले. यावेळी राजेंद्रप्रसादांना खूप आनंद झाला होता. इतर वेळी आपल्या सहकाऱ्यांना शिक्षा होतात व आपण मोकळेच राहतो याचे दुःख त्यांच्या मनात सलतच होते.

खटल्याचा निकाल लागेपर्यंत कैद्यांना घरचे अन्न, फळे वगैरे देता येत असत. राजेंद्रप्रसादांच्या बंधूंनी त्यांच्यासाठी घरचे जेवण पाठविलेही. पण राजेंद्रप्रसादांनी ते घेण्यास स्पष्ट नकार दिला. बाकीच्या सर्वसामान्य कैद्यांना जे अन्न दिले जाते तेच आपल्याला मिळावे. मीसुद्धा त्यांच्यातलाच एक आहे. मग पंक्तिप्रपंच कशाला? म्हणून तेच अन्न देण्यासाठी आग्रह धरला. या तुरुंगात त्यांना 'अ' वर्ग दिला होता. पण समानतावादी राजेंद्रप्रसादांना हा भेदभाव मान्य झाला नाही.

या खटल्यात राजेंद्रप्रसादांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. पण योगायोगाची गोष्ट अशी की ज्या न्यायाधीशाने ही शिक्षा सुनावली ती व्यक्ती राजेंद्रप्रसाद वकील असताना त्यांची अशील होती. अर्थात एके काळी आपली बाजू मांडून आपल्याला शिक्षा होऊ नये, आपल्याला योग्य तो न्याय मिळावा म्हणून लढणाऱ्या आपल्याच या ज्येष्ठ वकिलाला शिक्षा सुनावताना त्या न्यायाधीशाला काय वाटले असेल याची केवळ कल्पनाच केलेली बरी.

☆ ☆ ☆

# २१. तुरुंगातही कार्य


सहा महिन्यांची शिक्षा भोगण्यासाठी राजेंद्रप्रसादांना हजारीबागच्या तुरुंगात ठेवण्यात आले होते. हे सहा महिने त्यांनी योगीजनांच्या आत्मानंदात व ऋषि-मुनींच्या मनन-चिंतनात घालवीला. तुरुंगाच्या अधिकाऱ्यांच्या परवानगीने वाचण्यात, लिहिण्यात व सूत कातण्यात ते वेळ घालवित असत. ते विणायलाही शिकले. आपल्या शिक्षेच्या काळात त्यांनी दोनशेवर नवार व पंधरा वार कापड विणले. हे कापड व नवार पाहून त्यांना पुढे खूप अभिमान वाटत असे.

याच काळात त्यांनी गांधीजींच्या लेखांचे वर्गीकरण केले. त्याचे स्वतंत्र भाग बनविले. त्याला स्वतःची प्रस्तावना जोडण्याचे काम सुरू केले. याचबरोबर उपनिषदे, पतंजलीचे योग सूत्र व इतर वैदिक धार्मिक वाङ्मयाचाही त्यांनी अभ्यास केला.

इतके दौरे करून, देशाच्या कानाकोपऱ्यांत जाऊन, भाषणे करून त्यांना माणसात मिसळण्यास मिळाले नव्हते. तुरुंगात ती संधी मिळाली. लोकांचे जवळून अंतरबाह्य दर्शन घेता आले. या गोष्टीचा विशेष आनंद त्यांना झाला. खऱ्याखुऱ्या मानवी जीवनाची ओळख त्यांना झाली. म्हणूनच ते म्हणतात, 'हजारीबाग तुरुंगाची आठवण मी कधीच विसरणार नाही.'

बिहारमधील सत्याग्रहात त्यांनी पोलिसांच्या अमानुष व निर्दय वागण्याच्या बरोबरच त्यांच्यातील माणुसकीचे व सहानुभूतीचे प्रसंग व गुण नेमके टिपले होते.

गांधी-आयर्विन बोलणी संपल्यावर चळवळ फार भडकली. राजेंद्रप्रसादांनाही पकडण्यात आले. हजारीबागप्रमाणेच यावेळीही बांकीपूर तुरुंगातही अन्न वगैरेच्या सवलती त्यांना देऊ



**एका लंगड्या अधिकाऱ्यास राजेंद्रबाबूंनी न्याय मिळवून दिला.**

केल्या होत्या, पण याही वेळी त्यांनी सवलती नाकारल्या.

कलकत्ता तुरुंगात पंधरा महिन्यांची सजा भोगण्यासाठी त्यांना ठेवले असता त्यांच्या दम्याने उचल खाल्ली. ते खूप अशक्त झाले. त्यांचे बंधू महेंद्रने सरकारला विनंती केल्यानंतर त्यांना पाटण्याच्या हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले. पण तेथेही त्यांची प्रकृती जास्तच खालावली. डॉक्टरांनी त्यांना सोडण्याचा सल्ला दिला. पण त्यांचा पाय दवाखान्याबाहेर पडण्यापूर्वीच बिहारमध्ये भूकंपाने हैदोस केला होता. विश्रांती न घेताच ते लोकांच्या मदत कार्यात गुंतून गेले.

बांकीपूरच्या तुरुंगात जाण्याआधी ते एका देशी वैद्याचे औषध घेत होते. तुरुंगात त्यांना इंग्रजी पद्धती (ॲलोपथी) ची औषधे घ्यावी लागली. ते म्हणत, "कैद्याला स्वतःचे स्वातंत्र्य राहत नाही. जशा जेवणाच्या आवडीनिवडी सांभाळता येत नाहीत तसंच औषधांची आवडनिवड सांभाळणं कठीण आहे."

तुरुंगात ते इतर कैद्यांना खूप मदत करत. एका फाशीची शिक्षा झालेल्या कैद्याला दयेचा अर्ज लिहून दिला व त्याची फाशी वाचविली. दुसरा एक कैदी होता, साठ वर्षांचा म्हातारा. एका पायाने लंगडा. दरोड्यात भाग घेतला म्हणून त्याला सात वर्षांची शिक्षा झाली होती. त्याला डोक्यावर तांदळाची गोणी घेऊन एक मैल (सुमारे दीड किलोमीटर) पळत जावे लागे. पण वय व लंगडा पाय यामुळे त्याला हे करणे शक्यच नव्हते. राजेंद्रप्रसादांनी त्याच्यावतीने हायकोर्टात अपील केले. तो लंगडा व म्हातारा असल्याने हे करू शकत नाहीत हे सिद्ध केले. पहिला पुरावा खोटा ठरविला. खालच्या कोर्टाने केलेली शिक्षा पूर्णपणे रद्द ठरविली.

तुरुंगाची पाहणी करणाऱ्या कमिटीने त्यांची प्रकृती पाहून सुटकेची शिफारस करू काय म्हणून विचारले तेव्हा ते म्हणाले, "माझ्या बरोबरच्या सर्व कैद्यांची सुटका झाल्याशिवाय शिफारस करू नका."

तुरुंगात असतानाच त्यांनी हिंदु मुसलमानांच्या ऐक्याचे चिंतन करणे चालविले होते. या प्रश्नाचा साधकबाधक विचार करून त्यांनी सांगितले की, पाकिस्तान सुखासुखी अस्तित्वात येणे शक्य नाही व समजा आला तरी ते स्थापन करण्यात खुद्द मुसलमानांचेच खूप नुकसान आहे. त्यांनी हे या पुस्तकात लिहिले त्याची पहिली आवृत्ती फक्त दोन महिन्यांतच संपली.

☆ ☆ ☆

## २२. राजेंद्रप्रसादांचे थोरपण

राजेंद्रप्रसादांनी अनेक चळवळी, अनेक सत्याग्रह व अनेक आपत्तींच्या वेळी स्वतः पुढाकार घेऊन जे कार्य केले ते अद्वितीयच होते. कौटुंबिक आपत्तींची पर्वा न करता, स्वतःच्या प्रकृतीकडे डोळेझाक करून राजेंद्रप्रसादांनी मोठे कार्य केले. खादी प्रसार, हिंदी भाषा प्रसार, राष्ट्रीय शिक्षण प्रसार या कार्यात ते सतत आघाडीवर असत. शेतकरी, मजुरांचे नेतृत्व करून त्यांनाही न्याय मिळवून दिला.

किसान-जमीनदार, मजूर-मालक यांच्यातील वाद मोठ्या कौशल्याने मिळविले. गांधीजींच्या प्रेरणेने खेड्यातील कला, संस्कृती, उद्योग इ. गोष्टींची शहरवासी लोकांना ओळख करून दिली.

त्यांच्या सर्व कार्यामुळेच भारतात १९४६

साली जेव्हा कामचलावू सरकार पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली नेमले गेले तेव्हा त्यात राजेंद्रप्रसाद यांना अन्न व शेतकी खात्याचे मंत्रीपद देण्यात आले. त्यावेळी धान्योत्पादन वाढविणे, परदेशामधून धान्य आयात करणे व त्याचे सर्व जनतेत योग्य प्रमाणात वाटप करणे या गोष्टींकडे त्यांनी लक्ष पुरविले. ते नेहमी शेतकऱ्यांना म्हणत असत–

"बाबांनो, तुम्ही हातात नांगर धरला तो तुमच्या एकट्यासाठी, धान्य उत्पादन करण्यासाठी नाही तर सबंध देशाला पुरेल इतके धान्य पिकविण्यासाठी."

पुढे देशातील राजकीय आणीबाणी ओळखून राजेंद्रप्रसाद यांना कठीण प्रसंगी काँग्रेसचे अध्यक्ष बनविण्यात आले. यावेळी त्यांना मंत्रीपद सोडावे लागले.

१९४६ साली घटना समिती स्थापन करण्यात आली. तिचे अध्यक्षपद राजेंद्रप्रसादांना देण्यात आले. घटना प्रत्यक्ष लिहिण्यासाठी एका उपसमितीची स्थापना करण्यात आली. या उपसमितीचे अध्यक्षपद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देण्यात आले. या कामी श्री. बेनिगल राय त्यांना सल्ला देत होते.

राजेंद्रप्रसादांना अध्यक्ष नेमले तेव्हा डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् म्हणाले, "राजेंद्रप्रसाद म्हणजे शुचिता, मृदूता, सौम्यता, अभिजातता, औदार्य, धैर्य, गांभीर्य यांचे ते निवासस्थान आहेत."

श्री. गोपाळ स्वामी अय्यंगार म्हणाले– 'राजेंद्रप्रसाद म्हणजे नम्रता, ऋजूता, मृदूता, शालीनता, समता, विचारातील सयुक्तिकता, बुद्धीमधील समतोल इ. गुणांचा समन्वय होय.'

डॉ. सरोजिनी नायडू म्हणाल्या, 'राजेंद्रप्रसाद यांना आध्यात्मिक गुणांचा वारसा प्रत्यक्ष भगवान बुद्धापासूनच प्राप्त झाला आहे. सत्य, अहिंसा, प्रेम, निर्वैरता, दया, क्षमा, शांती हे गुण भगवान गौतम बुद्धाच्या निष्ठावंत उपासकालाच शोभून दिसतात. या गुणांच्या सामर्थ्यावरच ते घटना समितीचे पालनपोषण व रक्षण पित्याच्या प्रेमानेच करतील आणि जगात तिचा दर्जा व मान वाढवितील, असा साऱ्याच जनतेला विश्वास वाटतो.

उत्तरादाखल केलेल्या भाषणात ते म्हणाले, "मी या क्षणापासून घटना समितीचा अध्यक्ष झालो असून यापुढे मी कोणत्याच एका पक्षाचा, धर्माचा किंवा जातीचा राहिलो नाही. केवळ तुम्हा सर्वांच्या व देशाच्या सेवेसाठी झटणारा एक सेवक झालो आहे."

या घटना समितीचे काम तीन वर्षे चालले व २६ जानेवारी १९५० रोजी भारत हे सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य बनले. यावेळेपासून गव्हर्नर जनरलच्या अधिकारांचा शेवट झाला व त्याची जागा भारताच्या अध्यक्षाने – राष्ट्रपतीने घेतली.

२६ जानेवारी १९५० या दिवशी स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून त्यांनी शपथ घेतली. पुढे १२ वर्षे देशाचे सूत्रसंचलन केले. या काळात त्यांनी जे कार्य केले त्यावरून त्यांच्याबद्दल काढले गेलेले गौरवाचे उद्‌गार किती सार्थ होते त्याचे दर्शन घडले.

१९५२ व १९५७ साल अशा दोन वेळा ते राष्ट्रपती म्हणून निवडून आले. स्वतःच्या प्रपंचाकडे पाठ फिरवून देशाचा प्रपंच केला. स्वतःच्या सुख-दुःखाचा विचार सोडून देशाच्याच सुख-दुःखाचा नेहमी विचार केला.

१९६२ सालापर्यंत ते राष्ट्रपतीपदावर होते. या पदावरून निवृत्त होताच उरलेले आपले आयुष्य त्यांनी आपल्या 'सदाकत आश्रमा'त अतिशय शांतपणे घालविले. १९६३ साली त्यांनी अत्यंत शांतपणे या जगाचा अखेरचा निरोप घेतला.

☆☆☆

BVBK-0402941


श्री गणपतीच्या गोष्टी
श्रीकृष्णाच्या गोष्टी
श्री देवीच्या गोष्टी
श्री पांडुरंगाच्या गोष्टी
श्रीरामाच्या गोष्टी
श्री खंडोबाच्या गोष्टी
मारुतीच्या गोष्टी
बालगोपाल
-किशोरकिशोरींकरिता
थोर संत -महात्म्यांच्या
संस्कारक्षम बोधात्मक
श्री संत तुकाराम
श्री संत ज्ञानेश्वर
श्री नवनाथांच्या गोष्टी
सरस्वती ग्रंथ भांडार, पुणे २.